कृषीवल
रायगड, गुरुवार, दि. १८ जुलै २०२४
किंमत ४ ₹

## दादा-फडणवीसांचे हेलिकॉप्टर भरकटले

**मुंबई :** राज्याचे दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजीत पवार त्यांच्या सोबत उद्योग मंत्री उदय सामंत आणि पार्थ पवार नागपूर ते गडचिरोली हेलिकॉप्टर प्रवासात सुदैवाने बचावले आहेत. खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर पावसाळी ढगात भरकटले होते. खराब हवामानामुळे दृष्यमानता अत्यंत कमी झाली होती. हेलिकॉप्टर पायलटने मोठ्या कौशल्याने हेलिकॉप्टर जमिनीवर उतरवले. त्यामुळे पुढील मोठी दुर्घटना टळली.चार महत्त्वाचे नेते या हेलिकॉप्टरमध्ये होते. त्यावेळी हेलिकॉप्टर भरकटले होते. पान २ वर

## जाहिरात फलक कंपनीला क्लीनचिट

**पनवेल :** खारघर येथील जाहिरात फलक कोसळून घडलेल्या दुर्घटनेला फलक उभारणारी कंपनी जबाबदार नसून, फलक सुरक्षित असल्याचा रिपोर्ट देणारे ऑडिटर जबाबदार असल्याचा दावा करत ऑडिट रिपोर्ट देणाऱ्यांना ब्लॅकलिस्ट करण्याच्या अनुषंगाने काय कारवाई करता येईल यासाठीची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती उपायुक्त मारुती गायकवाड यांनी दिल्याने जाहिरात फलक उभारणाऱ्या कंपनीला पालिकेकडून क्लीनचिट देण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे. पालिका हद्दीत जाहिरात फलक उभारण्यासाठी पान २ वर

# 1567 पूर आणि दरडग्रस्त कुटुंबांना

# प्रतीक्षा पुनर्वसनाची

सुयोग आंग्रे

। रायगड ।

नैसर्गिक आपत्ती आणि रायगड जिल्हा असे समीकरण २००५ पासून सुरु झाले आहे. सरासरीपेक्षा अधिक पडणाऱ्या पावसामुळे रायगड जिल्ह्यातील नद्यांना येणारे महापूर आणि दरडींचे भूस्खलन याची भीती नागरिकांसह प्रशासनालादेखील असते. गेल्या १९ वर्षात पावसाळ्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे रायगड जिल्ह्यात सुमारे २३०५ हजार कुटुंबे बाधित झाल्याचे सरकार दरबारी नोंद आहे. यापैकी तब्बल १५६७ कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात सरकार अपयशी ठरले आहे.




**शासनाकडे प्रस्ताव पाठविले आहेत, त्रुटींमुळे प्रस्ताव प्रलंबित आहे, निधी प्राप्त झालेला नाही, भूखंड आणि निधी मिळाला आहे पण बांधकाम करण्यात आलेले नाही अशी बहुतांशी कारणे पुनर्वसन रखडण्यामागे असल्याचा अहवाल जिल्हा प्रशासनाकडून प्राप्त झाला आहे. आतापर्यंत केवळ ४४९ कुटुंबांना घरे मिळाली असल्याचे विदारक चित्र रायगड जिल्ह्यात पाहावयास मिळत आहे.**

पूर आणि दरडी कोसळण्याच्या प्रकारामुळे रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या रडारवर आला. रायगडातील वाढणारे काँक्रिटचे जंगल, वाढणारे भराव आणि अनधिकृत उत्खनन यामुळे जिल्ह्याला पुराचा आणि दरडी कोसळण्याचा धोका अधिक वाढला. गेले १९ वर्षात पूर आणि दरडी कोसळण्याच्या प्रकारामुळे सुमारे ४० गावांना फटका बसला आहे. या नैसर्गिक आपत्तीमध्ये महाड तालुक्यातील २३ गावे, पोलादपूर तालुक्यातील सात गावे, माणगाव तालुक्यातील चार गावे, रोहा तालुक्यातील तीन गावे, पनवेल तालुक्यातील दोन गावे, कर्जत आणि खालापूर तालुक्यातील प्रत्येकी एका गावाचा समावेश आहे. आपत्तीमध्ये बाधित झालेल्या कुटुंबांपैकी पान २ वर



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ

## विमानाने केली सिग्नल चाचणी

। पनवेल । वार्ताहर ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे मल्टिमॉडेल कनेक्टिव्हिटी असणारे देशातील पहिले विमानतळ असणार आहे. या विमानतळावरून मार्च २०२५ मध्ये पहिल्या विमानाचे टेकऑफ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याच पार्श्वभूमीवर आषाढी एकादशीच्या दिवशी म्हणजेच बुधवारी ( दि. १७) नवी मुंबई विमानतळावर विमानाच्या सिग्नलची चाचणी घेण्यात आली. सिग्नल पान २ वर

**विमानतळाची वैशिष्ट्ये**

**नवी मुंबई विमानतळ पाच टप्प्यात उभारले जाणार आहे. टप्पा क्रमांक १ आणि २ एकत्रित पूर्ण केले जाणार आहे. यात एक टर्मिनल आणि एक रन वे असणार आहे. याअंतर्गत २ कोटी प्रवासी प्रवास करू शकतील, असा अंदाज आहे. टप्पा क्रमांक ३, ४ आणि ५ मध्ये तीन टर्मिनल आणि एक रन वे असणार आहे. या टप्प्यानंतर वार्षिक ९ कोटी प्रवासी वाहतूक होईल, असा अंदाज आहे.**

## किनेश्वरवाडी येथे कोसळली दरड

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील किनेश्वरवाडी येथे नियोजित धरणासाठी ठेकेदाराकडून सेवानिवृत्त महसूली अधिकारी व खासगी व्यक्तींमार्फत जमिनीची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आल्यानंतर गुगल मॅपवर ज्या भागाचा इन्व्हेस्टर पॉईंट असा उल्लेख येऊ लागला आहे; त्या किनेश्वरवाडीच्या रस्त्यावर मातीच्या ढिगाऱ्यासोबत महाकाय दगड कोसळल्याची घटना घडल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे.

तहसिलदार कपिल घोरपडे आणि पोलीस ठाण्यातील हवालदार स्वप्नील कदम यांनी घटनास्थळी जाऊन ग्रामस्थांना दरडीच्या धोक्याची कल्पना देऊन सुरक्षितस्थळी मुक्कामी राहण्याचे आवाहन केले.



पोलादपूर तालुक्यातील किनेश्वरवाडी येथील नियोजित धरणासाठी २००९ मध्ये लघुपाटबंधारे विभागामार्फत कार्यक्रम तयार करण्यात येऊन अनुकूलता दर्शक अहवाल तयार करण्यात पान २ वर

## मुंबई-गोवा महामार्गावर खड्डे बुजवण्याचा दिखावा

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील गेल्या चार दिवसांपासूनचा मेगाब्लॉक हा चक्क डम्परमधून सिमेंटमिश्रीत दगडाची भुकटी म्हणजेच ग्रीट खड्ड्यांमध्ये ओतण्याचा कार्यक्रम ठरल्याची वस्तुस्थिती महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना दिसून आली. ११ ते १३ जुलैदरम्यान दिवसांतून दोन वेळा हा मेगाब्लॉक घेण्यात आला होता. या काळात कोलाडजवळील पुई येथील पुलावर गर्डर टाकण्यासाठी घेण्यात आलेल्या या मेगाब्लॉकदरम्यान इंदापूर ते वीर दरम्यानच्या महामार्गावरदेखील खड्डे बुजविण्याचा दिखावा सुरू करण्यात आला होता.

पळस्पे ते इंदापूर दरम्यानचे मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम तब्बल १२ वर्षे रखडले असून कासू ते इंदापूर दरम्यानच्या पुलांची कामेदेखील रूंदीकरण पूर्णत्वाला जात आले तरी रखडले आहेत. पुई येथील नियोजित पुलावर गर्डर बसविण्याकामी पान २ वर

## तक्का आदिवासीवाडी रस्ता गेला वाहून

**शेतकरी आदिवासी बांधवांना सोसावे लागताहेत हाल !**

। कोर्लई । वार्ताहर ।

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे मुरूड ते तक्का आदिवासीवाडी रस्ता वाहून गेल्याने साधी दुचाकीदेखील जाणे अवघड झाले असून ऐन पावसाळ्यात शेतीच्या कामासाठी जाणारे शेतकरी व आदिवासी बांधवांना आपल्या दैनंदिन जीवनात त्रास व हाल सोसावे लागत आहेत.



मुरूडच्या अलकापूरी पाण्याच्या टाकीपासून दिड किमी अंतरावर असलेला तक्का आदिवासीवाडी रस्ता आजपावेतो दुर्लक्षित राहिला आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही झालेल्या अतिवृष्टीमुळे पावसाळ्यात येथील आदिवासी बांधवांना बाजारहाट करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना आपली अवजारे साहित्य शेतात घेऊन जाणे अवघड झाले आहे. अतिवृष्टीमुळे हा रस्ता मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी जाऊन वाहून गेल्याने रस्त्यावरुन पायी चालणे अवघड झाले आहे. पान २ वर

## महाराजांची वाघनखं मुंबईत

**मुंबई :** लंडन येथील व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियममध्ये ठेवलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखं महाराष्ट्रात परत आणण्यात आले आहेत. पुरातत्व विभाग आणि कस्टम विभागाच्या सहकार्याने ही वाघनखं मुंबईत आणण्यात आली आहेत. मुंबईत दाखल झाल्यानंतर सातारा पोलीस आणि पुरातत्त्व विभागाकडून या वाघनखांची तपासणी करण्यात आली आणि नंतर ते सातारा येथे नेण्यात येतील. या ऐतिहासिक शस्त्राला परत आणण्याचे महत्त्व पूर्ण महाराष्ट्राला आहे. शिवरायांची वाघनखं उद्या म्हणजे गुरुवारी (दि.१८) महाराष्ट्रात येणार असून पान २ वर

## दोन शाळकरी मुलांचे अपहरण

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील सानेगाव आणि म्हसळ्यामधील दोन शाळकरी मुला- मुलींचे अपहरण करण्यात आले आहे. सानेगाव आश्रम शाळेतील मुलगी व म्हसळा येथील शाळेतील मुलगा असे दोघांना पळवून नेल्याची तक्रार रोहा व म्हसळा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रामराज परिसरातील खैरवाडी येथील ही मुलगी असून ती सानेगाव आश्रम शाळेत शिक्षण घेत आहे. रविवारी दुपारी आश्रम शाळेतून घरी जात होती. दरम्यान सानेगाव स्थानकाजवळ ती थांबली होती. तिच्या सोबत तिची आईदेखील होती. परंतु भाचीला आणण्यासाठी तिची आई तिला स्थानकाजवळ ठेवून पुन्हा आश्रम शाळेत गेली. याचा फायदा घेत कोणीतरी त्या मुलीचे अपहरण केले. याप्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात आईने पान २ वर









# रस्ता दुभाजकासाठी अनोखी शक्कल

## कशेडीतील भुयारात उभे केले पिंप

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

गेल्या आठवड्यामध्ये कशेडी घाटातील दरवर्षी खचणाऱ्या रस्त्यावरून एक गॅस सिलिंडर वाहक ट्रक डेंजरझोनमधून दरीमध्ये कोसळल्याच्या घटनेनंतर पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गातील अवजड वाहतूक सुरू करण्यात आली आणि दोन्ही बाजूने वाहतूक सुरू झाली. यादिवशी अवजड वाहनांनाही भुयारातून मार्गक्रमण करून देण्यात आले होते. मात्र, येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांनी लेनची शिस्त पाळण्यासाठी भुयारी मार्गात चक्क रिकामे पिंप उभे करून रस्ता दुभाजक म्हणून कामचलाऊ पध्दत अवलंबिण्यात आणल्याचे दिसून येत आहे. अशा अनेक कारणांवरून भुयारी मार्ग सतत चर्चेत राहिला आहे.

गेल्या वर्षभरापासून पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गाची चर्चा सर्वच पातळीवर सातत्याने होत आहे. जे भुयार कोकणातून मुंबईकडे जाण्यासाठी आहे; त्या भुयाराचा वापर मुंबईतून कोकणाकडे जाण्यासाठी एकेरी स्वरूपात सुरू झाला होता. सर्वात आधी गणेशोत्सव काळात भुयारी मार्गातून वाहतूक सुरू करण्यात आल्यानंतर रायगड जिल्ह्यातून खेडकडे जाणाऱ्या मतदारांना लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भुयारी मार्ग खुला करून देण्यात आला. यानंतर प्रत्येक सणावाराला भुयारी मार्ग सुरू करून काही कालावधीनंतर बंद करण्यात आल्याचीही चर्चा सुरू झाली. भुयारातून जाणाऱ्या वाहनांवर गेल्या तीन वर्षांपासून अखंड जलाभिषेक होत असल्याने या पार्श्वभूमीवर भूगर्भ शास्त्रज्ञांकडून भुयाराच्या वरील भागातील कातळामध्ये जलाशय आहे अथवा कसे याची खात्री करून घेण्याची चर्चा झाली होती.

भुयारी मार्गामध्ये वायूविजनाची सोय नसल्याने काही अंतरावर गेल्यानंतर भुयारात गुदमरण्याचा अनुभव येत असल्याचे दुचाकी स्वार आणि रिक्षाचालकांचे म्हणणे आहे. मात्र या परिस्थितीबाबत



चर्चा कमी झाली. अलिकडेच, भुयारी मार्गातून अवजड वाहतूक बंद करण्यात आली आणि तोदेखील चर्चेचा विषय ठरला आणि कशेडी घाटातील दरवर्षी खचणाऱ्या रस्त्यावरून गॅस सिलिंडरवाहक ट्रक डेंजरझोनमधून दरीमध्ये कोसळल्याच्या घटनेनंतर पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गातील अवजड वाहतूक सुरू करण्यात आली होती. कशेडी घाटातील गॅस सिलिंडर वाहतूक करणाऱ्या ट्रकला दरीतून बाहेर काढण्यात आल्यानंतर भुयारातील अवजड वाहतूक तातडीने बंद करण्यात आली. मात्र, दुहेरी वाहतूक आजतागायत सुरू असल्याने भुयारातून कोकणाकडे जाणारी आणि मुंबईकडे जाणारी वाहने समोरासमोर येऊन भुयारी मार्गामध्ये अपघात घडू नये, यासाठी रिकामे पिंप उभे करण्यात येऊन त्यावर रिफ्लेक्टर स्टीकर्स चिकटविण्यात येऊन या पिंपांचा रस्तादुभाजक म्हणून वापर सुरू करण्यात आला आहे. भुयारी मार्गातून लवकरात लवकर बाहेर पडण्यासाठी तसेच वायूवीजनाच्या अभावामुळे गुदमरण्याची अवस्था टाळण्यासाठी वाहनांचा वेग मर्यादेपेक्षा अधिक असल्याचे दिसून येत आहे. यामुळे चालकांचे वाहनावरील नियंत्रण ढळून या पिंपांवर वाहने धडकून अपघात होण्याची शक्यता वाढीस लागल्याची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे.

भुयारी मार्गाचे काम करणाऱ्या एसडीपीएल या ठेकेदार कंपनीकडून भुयारी मार्गात अपघात घडू नये, यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळेच अपघात घडण्याची शक्यता निर्माण झाल्याने कोकणाकडे जाणाऱ्या भुयारी मार्गाचे काम पूर्ण झाल्यास मुंबईकडे जाणाऱ्या भुयारीमार्गावर रस्तादुभाजकाची गरज राहणार नसल्याचा वाहनचालकांच्या चर्चेतून सूर निघत आहे.

# रायगडात १३ धरणे शंभर टक्के भरली

## सर्व धरणांत ७४.७६ टक्के पाणीसाठा

**। अलिबाग । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यात झालेला पाऊस हा प्राधान्याने धरण क्षेत्रात अधिक पडल्याने धरणांतील पाणीसाठा झपाट्याने वाढला आहे. २८ धरणांपैकी १३ धरणे ही शंभर टक्के भरली आहेत.

जिल्ह्यातील सर्व धरणांत मिळून ७४.७६ टक्के इतका पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे धरणावर अवलंबून असणाऱ्यांची पाण्याची चिंता मिटली आहे.

तेरा धरणे भरली असून, दोन धरणांत ९० टक्के पाणीसाठा आहे. तेरा धरणांमध्ये ७० टक्क्यांहून कमी पाणीसाठा आहे. रायगड २० दिवसांपासून पावसाला सुरुवात झाली आहे. पावसाने सुरुवात चांगली केली होती. त्यानंतर काही काळ विश्रांती घेतली होती. मात्र, रविवारी मध्यरात्री अलिबाग, मुरुड, म्हसळा, तळा, श्रीवर्धन या तालुक्यांत अतिवृष्टी झाली. ९ जुलैपर्यंत जिल्ह्यात एकूण तीन हजार ८९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सरासरी ३५ टक्के पाऊस पडला आहे. धरण क्षेत्रातही पावसाचे प्रमाण चांगले आहे.

**साचले मुबलक पाणी**

**रायगड पाटबंधारे विभाग कोलाड यांच्याअंतर्गत २८ लहान धरणे येतात. त्यापैकी तळा तालुक्यातील वावा, सुतारवाडीमधील रोहा, सुधागडमधील कोंडगाव, कवेळे, उन्हेरे, म्हसळामधील पाबरे, संदेरी, महाडमधील वरंध, खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे, खालापूर भिलवले, पनवेलमधील मोरबे ही तेरा धरणे शंभर टक्के भरली आहेत. मुरुड तालुक्यातील फणसाड ९९ टक्के, पनवेलमधील उसरण ९० टक्के भरले आहे. श्रीवर्धनमधील कुडकी ८३ टक्के, पेणमधील अंबेघर ८० टक्के भरले.**



# माणगावात मोहरम सण उत्साहात

**। माणगाव । वार्ताहर ।**

सालाबादप्रमाणे यावर्षीही माणगावात मोहरम सण पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. या सणानिमित्त माणगाव बाजारपेठे मोहल्ला येथील मुस्लीम बांधवांनी ताबुताची विसर्जन मिरवणूक वाजत-गाजत काढली होती. यावेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

बकरी ईदनंतर २० दिवसांनी मोहरम इस्लामी महिना सुरू होतो. चंद्रदर्शन झाल्यावर त्या रात्रीपासून मोहरम सणानिमित्त शहीद हसन व हुसैन यांच्यावर आधारित चरित्राचे वाचन मजलीसच्या निमित्ताने मुस्लीम बांधव करीत असतात.हा महिना तसा दुःखाचा मानला जातो! परंतु गेली अनेकवर्षापासून पारंपरिक पद्धतीने ताबुत काढून वाजत गाजत काही मुस्लीम बांधव हा सण साजरा करतात.

बुधवारी दुपारनंतर ताबुताची विसर्जन मिरवणूक काढून हा ताबूत दारोदारी नेऊन दर्शन घेतले. सायंकाळी उशिरा या ताबुताचे माणगाव काळ नदीत उत्साहात विसर्जन करण्यात आले.

# माणगाव येथील उद्योजक विजय मेथा यांचा सन्मान

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक व शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबीर सेवाभावी संस्था माणगावचे सल्लागार तथा गोरगरीब जनतेला दृष्टी मिळवून देण्यात आनंद मानणारे खेमचंद (विजयशेठ) मेथा यांचा शंकरा आय हॉस्पिटल न्यू पनवेलतर्फे २९ जून रोजी यथोचित सन्मान करण्यात आला.



मेथा हे गेली दोन वर्षांपासून माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल न्यू पनवेल यांच्या सहकार्याने आपल्या विजयशेठ चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करीत आहेत. खाजगी रुग्णालयांतून होणारी मोतीबिंदू शस्त्रक्रिया याचा खर्च गोरगरीब, सर्वसामान्य जनतेला न परवडणारा आहे. याचा विचार करीत विजयशेठ मेथा यांनी गरीब जनतेची सेवा हीच खरी ईश्वर सेवा मानून गरिबांना आपल्या सामाजिक कार्यामुळे मिळणारी दृष्टी याचा निखळ आनंद मानून मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करीत आहेत.मेथा यांच्या या समाजसेवी कार्याचा गौरव म्हणून त्यांना शंकरा आय हॉस्पिटल न्यू पनवेलतर्फे प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. राजेश कापसे, डॉ. प्रकाश पाटील, डॉ.गिरीश बुधराणी, डॉ. आर.रामाणी, डॉ. राधा रामाणी, विधिता मेथा, स्नेहल मेथा आदी मान्यवरांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# ३८ लाखांची फसवणूक

**। रसायनी । वार्ताहर ।**

मोहोपाडा नवीन पोसरी येथील कल्याणी भोईर हिने तिच्या पदाचा गैरफायदा घेत बँकेत येणाऱ्या खातेधारकांना विश्वासात घेऊन मोठी फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत एचडीएफसी बँकेचे मॅनेजर निखिल चंद्रे यांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

कल्याणी भोईर खातेदारांना त्यांच्या आर्थिक व्यवहारादरम्यान ओळख करून ग्राहकांना जम्बो लोन, इन्टा लोन, आरडी, एफडी, क्रेडीटकार्ड, नेट बँकिंग इ. सुविधा जलद पुरवणेकामी त्यांचा विश्वास संपादन करून अर्जदारांच्या अज्ञानीपणाचा फायदा घेऊन फसवणूक करत होती. त्यांच्या खासगी माहितीचा गैरवापर करून त्यांचे नावे क्रेडीट कार्ड काढून खासगी कामासाठी वापर करून त्याची परतफेड केली नाही. कल्याणीने एकूण ३८,०३,५०० रूपयांची फसवणूक केली असून सन २०१७ ते फेब्रुवारी २०२४ दरम्यान एचडीएसी बँकेत गैरप्रकार केल्याचे निष्पन्न झाले आहे.

# मॉर्निंग वॉक ग्रुपतर्फे निर्मला पाटील यांचा सत्कार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मॉर्निंग वॉक ग्रुप, आंबेपूर-पेझारीच्या सदस्य, श्रीगाव येथील आदर्श माता आणि भाजीविक्रेत्या निर्मला नारायण पाटील यांच्या ७७ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून रविवारी (७ जुलै) कृतज्ञता म्हणून मॉर्निंग वॉक ग्रुप, आंबेपूर-पेझारीच्या वतीने त्यांचा हृद्य सत्कार करण्यात आला.



मॉर्निंग वॉक ग्रुप, आंबेपूर-पेझारीतर्फे या ग्रुपचे अध्यक्ष प्रकाश म्हात्रे यांच्या संकल्पनेतून ज्येष्ठांचा सन्मान केला जातो. त्यांच्याच हस्ते निर्मला पाटील यांचा पुष्पगुच्छ, मानपत्र, शाल, साडी देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी या ग्रुपचे उपाध्यक्ष अनिल पाटील, सचिव जी.सी. पाटील, विकास द. पाटील, नितीन पाटील, रामचंद्र म्हात्रे, सुनील राऊत, सुरेश पाटील, वैकुंठ पाटील, आर.जे. पाटील, संदेश पाटील, संतान पाटील, रमेश पाटील, नंदकुमार राऊत, पांडुरंग पाटील आदी मॉर्निंग वॉक ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. तसेच निर्मला पाटील यांचे सुपुत्र किशोर पाटील, राजेश पाटील, नात डॉ. श्रद्धा किशोर पाटील, नातू सिव्हिल इंजिनियर करण किशोर पाटील, सुना, इतर नातवंडे व समस्त पाटील कुटुंबिय, त्यांचा मित्र परिवार उपस्थित होता.

याप्रसंगी मॉर्निंग वॉक ग्रुपचे अध्यक्ष प्रकाश म्हात्रे यांनी अध्यक्षीय भाषणातून अतिशय कष्टातून वर आलेल्या आणि आपले कुटुंब घडविणाऱ्या निर्मला मावशी मॉर्निंग वॉक ग्रुपला प्रेरणा देणाऱ्या आहेत, त्यामुळे कृतज्ञता म्हणून त्यांचा सत्कार केला असल्याचे सांगितले. ग्रुपच्या सदस्यांनी आपल्या मनोगतातून निर्मला पाटील यांचा सन्मान केला. त्यानंतर त्यांच्या कुटुंबियांनी आपली मनोगते व्यक्त केली. तसेच केक कापून, औक्षण करुन त्यांचा ७७ वा वाढदिवस साजरा केला. सूत्रसंचालन विकास पाटील यांनी केले.

# साडेतेरा लाखांचे ८२ चोरी झालेले मोबाईल परत

## खारघर पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक

**। पनवेल । वार्ताहर ।**

लाख, ५० रुपयांचे ८२ चोरी आणि गहाळ झालेले मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले. खारघर पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात संबंधित मोबाईल परत करण्यात आले. आणखी ८०० मोबाईल ट्रेस करण्यात आले असून, लवकरच मोबाईल हस्तगत करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कामगिरीचे वरिष्ठांकडून खारघर पोलिसांचे कौतुक करण्यात आले आहे.



२०२३ ते २०२४ दरम्यान खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेकांचे मोबाईल चोरी, तर काहींचे मोबाईल गहाळ झाले होते. याप्रकरणी मोबाईल चोरीसह हरविल्याची नोंद करून पोलिसांनी तपास सुरू केला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे उप निरीक्षक ज्ञानोबा धुळगंडे, फिरोज आगा, वाजिद शेख, सचिन डावरे, मोरे असे अन्य पोलीस पथकाने मुंबईसह इतर राज्यांतून चोरीसह गहाळ झालेले १३ लाख ५० हजार रुपयांचे ८२ मोबाईल हस्तगत केले होते. संबंधित मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना पोलीस ठाण्यात बोलावून परत करण्यात आले. यावेळी या मालकांनी खारघर पोलिसांचे आभार व्यक्त केले. इतर ८०० मोबाईलची माहिती काढण्यात पोलिसांना यश आले असून, लवकरच ते मोबाईल हस्तगत करुन त्यांच्या मालकांना परत करण्यात येणार असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ यांनी यावेळी सांगितले.

पान १ वरून

## दादा-फडणवीसांचे हेलिकॉप्टर भरकटले

गडचिरोलीत खराब हवामानाचा फटका त्यांना बसला होता. पण, सुदैवाने सर्वजण सुखरुप आहेत. हेलिकॉप्टर पायलटने यावेळी आपलं कौशल्य दाखवल्याचं सांगितलं जातं. त्याने सुखरूप हेलिकॉप्टर जमिनीवर उतरवलं

अजित पवारांनीच हा किस्सा आज सांगितला आहे. हेलिकॉप्टर व्यवस्थित उडालं, पण ते नंतर भरकटलं. हेलिकॉप्टर ढगात गेलं होतं. पण, देवेंद्र फडणवीस निवांत गप्पा मारत होते, असं अजित पवार म्हणाले आहेत. सुदैवाने पायलटने कौशल्य दाखवत हेलिकॉप्टर जमिनीवर उतरवलं. त्यानंतर दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी गडचिरोलीच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावली.अजित पवार म्हणाले की, सुरुवातील बरं वाटलं, पण इकडे ढग, तिकडे ढग दिसत होतं. मी फडणवीसांना म्हटलं जरा बाहेर बघा. पण, ते म्हणाले काही काळजी करू नका. आतापर्यंत माझे सहा असे अपघात झाले आहेत. अशा अपघातामध्ये मला काही झालेलं नाही. त्यामुळे तुम्हाला देखील काही होणार नाही. तुम्ही निवांत राहा. मी काळजीत पडतो होतो. पण, फडणवीस निवांत होतं. मागची पुण्याई असेल. त्यामुळेच ते इथपर्यंत पोहोचले आहेत. उदय सामंत देखील आमच्यासोबत होते. ते म्हणाले दादा जमीन दिसायला लागली, तेव्हा कुठे माझा जीव भांड्यात पडला, असं अजित पवार म्हणाले.

## प्रतीक्षा पुनर्वसनाची

४४९ कुटुंबांचे पुनर्वसन जिल्हा प्रशासनाने केले आहे. यामध्ये महाड तालुक्यातील जुई बुद्रुक येथील ६६, रोहण १२, दासगाव ५७, तळिये ९२,कोंडिवते ६६, कुरळे दंडवाडी १७ दासगाव आदिवासीवाडी ४१, पोलादपूर तालुक्यातील कोंढवी १५, कोतवाल खुर्द १५, महाळुंगे ४, बोरावले ८, तुटवली ५, माणगाव तालुक्यातील न्हावे ८, भांदरे ४, रोहा तालुक्यातील वाळंजवाडी ८, महादेव वाडी ३१ कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यात आपत्तीमुळे बाधित झालेल्या आणि पुनर्वसनास पात्र ठरलेल्या तब्बल २०७८ कुटुंबांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनाची होती. परंतु गेल्या १९ वर्षात दासगाव आणि रोहण येथील ६२ कुटुंबांनी नाकारलेल्या पुनर्वसनाव्यतिरिक्त तब्बल १५६७ कुटुंब आजही पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहेत. यामध्ये महाड तालुक्यातील दासगाव येथील ४५ , तळिये ७९, परमाची १२८, कोंडिवते ३८, सव ८३, कोथेरी १५, शिंगरकोंड मोरेवाडी ४२, तुडील ६२, मुठवली ६५, मोहत सुतारवाडी ६७, सोनघर १०२, आंबिवली बुद्रुक पातेरेवाडी २४, चांढवे खुर्द १५३, आंबेशिवथर सह्याद्रीवाडी २२, रुपवली बौद्धवाडी ८, खैरे तर्फे तुडील २७, चोचिंदे ४०, दाभोळ मोहल्ला , बौद्धवाडी २० चोचिंदे कोंड ४८, पोलादपूर तालुक्यातील कोंढवी १४, कोतवाल खुर्द ११, केवनाळे १२८, तुटवली ५, साखर सुतारवाडी ४४, माणगाव तालुक्यातील टोळ खुर्द ११, बापदेव पट्टी ८, पनवेल तालुक्यातील धोधाणी ६७, हरिग्राम ३७ कर्जत तालुक्यातील ६९ आणि खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी ४७ यांचे पुनर्वसन रखडले आहे.

## किनेश्वरवाडी येथे कोसळली दरड

आल्यानंतर या भागातील धरणासाठी संपादित करण्यात येणाऱ्या संभाव्य जमिनींचे मोठया प्रमाणात खरेदी व्यवहार महसूल विभागाच्या अधिकाऱ्यामार्फत तसेच खासगी व्यक्तींमार्फत करण्यात आल्याने या क्षेत्रासाठी गुगल मॅप या ॲपवर इन्व्हेस्टर पॉईंट असा उल्लेख येऊ लागला आहे. याठिकाणी किनेश्वर ते किनेश्वरवाडी हा रस्तादेखील भूसंपादनाचा मोबदला अदा केल्याविना करण्याचे काम सुरू झाले होते. आड चांभारगणी येथून साधारणपणे १५० मीटर अंतरावरील रस्त्यावर लगतच्या डोंगरातून लाल मातीचे ढिगारे आणि तीन महाकाय दगड कोसळून दरडप्रवण क्षेत्र निर्माण झाले.

यामुळे गावाला धोका निर्माण होऊन तहसिलदार कपिल घोरपडे यांनी १७ कुटूंबांपैकी ७ कुटूंबातील २४ सदस्यांना किनेश्वरवाडी अंगणवाडी येथे सुरक्षितस्थळी स्थलांतरीत केले. यावेळी अंगणवाडीचा खंडित करण्यात आलेला विद्युतपुरवठा सुरळीत करून या ग्रामस्थांना रात्री दिवाबत्तीच्या उजेडामध्ये राहण्याची सुविधा केली. तहसिलदार घोरपडे यांच्यासोबत महसूली कर्मचारीदेखील ग्रामस्थांना सुरक्षितस्थळी स्थलांतरीत करण्यासाठी सहभागी झाले होते. हा किनेश्वर ते किनेश्वरवाडी रस्ता बॅरिकेटस् टाकून वाहतुकीस बंद करण्यात आला. यामुळे ग्रामस्थांना आड ते किनेश्वर मार्गाचा पर्यायी रस्ता म्हणून वापर करावा लागणार आहे.

पोलादपूर पोलीस ठाण्याचे हवालदार स्वप्नील कदम यांनी घटनास्थळी जाऊन ग्रामस्थांना दरडीच्या धोक्यापासून सावध राहण्यासह किनेश्वर ते किनेश्वरवाडी रस्त्याचा वापर करण्याचे बंद करण्याचे आवाहन केले.

## महाराजांची वाघनखं मुंबईत

१९ जुलैला मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत या वाघनखांचा भव्य दिव्य सोहळा पार पडणार आहे. उद्या संध्याकाळी वाघनखे सातारा येथील संग्रहालयात पोहोचतील.यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज उदयनराजे भोसले आणि शिवेंद्रसिंहराजे भोसले उपस्थित राहतील, मंत्रिमंडळातील कोणी उपस्थित राहण्याची शक्यता फार कमी आहे. शुक्रवारी सकाळी ११ वाजता सातारा येथे वाघनखं आणि इतर शिवकालीन शस्त्रांच्या प्रदर्शनीचे उद्‌घाटन करण्यात येईल. इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांनी एक महत्त्वाची माहिती पत्रकार परिषदेमध्ये उघड केली होती. त्यांच्या मते, व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियममधून आणण्यात आलेली वाघनखे छत्रपती शिवाजी महाराजांची नाहीत. त्यांनी सांगितले की, म्युझियमकडून केलेल्या पत्रव्यवहारात ही वाघनखे १९७१ मध्ये लंडनमध्ये ठेवण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. सावंत यांनी सरकारला जनतेची दिशाभूल न करण्याचे आवाहन केले आहे.

## दोन शाळकरी मुलांचे अपहरण

तक्रार दाखल केली असून पोलीस नाईक सुनील शिरसाठ अधिक तपास करीत आहेत. शाळकरी मुलगा हा म्हसळा येथील रहिवासी आहे. मंगळवारी (दि.१६) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारा तो शाळेत जातो, असे घरात सांगून गेला. संध्याकाळ होत आली तरीही तो घरी पोहचला नाही. त्यामुळे त्याच्या पालकांनी शाळेत विचारणा केली. आजूबाजूला विचारणा केली, तरीही तो मुलगा सापडला नाही. अखेर कोणीतरी त्याचे अपहरण केल्याचा आरोप करीत पालकांनी म्हसळा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलीस उपनिरीक्षक एडवळे अधिक तपास करीत आहेत.

## जाहिरात फलक कंपनीला क्लीनचिट

रौनक एजन्सीची नेमणूक पालिकेच्या माध्यमातून करण्यात आली आहे. या बदल्यात कंपनीकडून वर्षाला जवळपास चार कोटी ११ लाख रुपयांचा महसूल पालिकेला मिळणार आहे. कंपनीसोबत ९ वर्षाकारिता करण्यात आलेल्या करारानुसार महसूलाच्या रकमेत दरवर्षी पाच टक्क्यांनी वाढ होणार आहे. कंपनीसोबत करण्यात आलेल्या करारानुसार पालिका हद्दीत सध्या जाहिरात फलक उभारण्याचे काम सुरु आहे. कंपनी उभारत असलेले फलक सुरक्षित आहेत का याची खात्री करण्यासाठी पालिकेच्या पॅनलवर असलेल्या अभियंत्यांकडून हे ऑडिट केले जाते. खारघर येथे पडलेल्या फलकाचे शिवाजी सरोदे या अभियंत्यांनी ऑडिट केले होते. हा फलक सुरक्षित असल्याचा अहवाल अभियंते सरोदे यांनी पालिकेला दिला होता. मात्र हा अहवाल सादर केल्याच्या काही दिवसांनीच हा फलक कोसळल्याने स्ट्रक्चरल ऑडिट करणारा अभियंता सरोदे यांनी नेमकी कोणती तपासणी केली याविषयी साशंकता व्यक्त केली जात असून पालिकेने देखील फलक कोसळल्याचा ठपका सरोदे यांच्या माथ्यावर फोडल्याचे उपायुक्त गायकवाड यांनी दिलेल्या माहितीतून स्पष्ट होत आहे.

## विमानाने केली सिग्नल चाचणी

चाचणीसाठी विमानतळ परिसरात विमान येणार असल्याने पनवेल आणि उरण तालुक्यातील नागरिकांनी गर्दी केली होती. बुधवारी केलेल्या सिग्नल चाचणीचा अहवाल भारतीय विमान प्राधिकरणाला पाठविण्यात येणार आहे.

नवी मुंबई विमानतळ परिसरात पहिल्यांदाच विमानाच्या सिग्नलची चाचणी करण्यात आली. धावपट्टीवर विमान उतरताना किंवा उड्डाण घेताना कोणता अडथळा येत नाही याची पाहणी करण्यासाठी ही चाचणी घेण्यात आली. भारतीय विमान प्राधिकरणाच्या विशेष विमानाने बुधवारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील सिग्नल यंत्रणेची चाचणी घेतली. विमान पाहण्यासाठी अनेकजण छोटे कॅमेरे व मोबाईल कॅमेऱ्याने फोटो व शुटिंग करण्यासाठी धावून आले. मोलमजुरी करणाऱ्या महिलांमध्ये देखील विमान पाहण्याची उत्सुकता निर्माण झाली होती. त्यांनी आयुष्यात प्रथमच विमान पाहिल्याचा आनंद चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. विमान आपल्याजवळ आल्याचे पाहताच सर्वांनी टाळ्या वाजवत त्याचे स्वागत केले.

**सिडकोचे कामावर लक्ष केंद्रित**

विमानतळ प्रकल्पासाठी वेगवेगळ्या संस्था काम करीत असून प्रत्येकाला तिची जबाबदारी आणि डेडलाइन आखून दिली आहे. त्यादृष्टीने काम सुरू आहे. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी विमानतळ प्रकल्पाच्या कामावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. तीन महिन्यांत त्यांनी जवळपास आठ ते दहा वेळा या प्रकल्पाला भेट देऊन कामाची पाहणी केली आहे. यामुळे रखडलेल्या या प्रकल्पाच्या कामाने वेग घेतला आहे. त्याचा पहिला टप्पा मार्च २०२५ मध्ये पूर्ण होण्याची शक्यता आहे.

## तक्का आदिवासीवाडी रस्ता गेला वाहून

शासनाच्या संबंधित बांधकाम विभागाने व ग्रामपंचायतीने यात लक्ष पुरवून तक्का आदिवासीवाडी रस्ता दुरुस्त करून चांगल्या रस्त्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## मुंबई-गोवा महामार्गावर खड्डे बुजवण्याचा दिखावा

वाहतूक महासंचालक कार्यालयामधील पोलीस अधिक्षक अरविंद साळवे यांनी या पुलावर गर्डर बसविण्यासाठी ११ ते १३ जुलैदरम्यान सकाळी ६ ते ८ आणि दुपारी २ ते ४ या दरम्यान मेगाब्लॉक घेण्यास मान्यता देऊन या कालावधीमध्ये महामार्गावरील वाहतूक पुणे बंगलोर रस्ता व अन्य पर्यायी मार्गावरून वळविण्याची अधिसूचना जारी करण्यात आली. याच दरम्यान पुई येथील पुलावर गर्डर बसविण्यासाठी ६ गर्डर आणि हे गर्डर पुलावर चढविण्यासाठी यंत्रसामुग्री आणून ठेवण्यात आल्याचे दिसून आले. या मेगाब्लॉकदरम्यानच्या महामार्गावरील वाहतुकीला बंदीदरम्यान इंदापूर ते वीर रेल्वे स्टेशनदरम्यान संबंधित ठेकेदारांकडून महामार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी डम्परमध्ये सिमेंटमिश्रीत ग्रीट म्हणजेच दगडाची भुकटी थेट डम्परमधून खड्डयांमध्ये ओतण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता.

या सिमेंटमिश्रीत ग्रीट म्हणजेच दगडाची भुकटीच्या डम्परमधून खड्डयांवर हे मिश्रण ओतता येईल अशा तऱ्हेने डम्पर खड्डयांजवळ उभा करून थांबविला जात असल्याचे तसेच डम्परमधील कामगार डम्परमधील सिमेंटमिश्रीत ग्रीट म्हणजेच दगडाची भुकटीचे मिश्रण खड्डयामध्ये फावड्याने ढकलून डम्परखालील कामगार ते मिश्रण खड्डयामध्ये पसरवित असल्याचे दृश्यं इंदापूर ते वीर दरम्यान महामार्गावर अनेकांना पाहायला मिळाले. याच दरम्यान मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर पावसाची संततधार कोसळत असल्याने खड्डयातील सिमेंटमिश्रीत ग्रीट म्हणजेच दगडाची भुकटीचे मिश्रण चिखलमय होऊन वाहनांचे टायर या भरावावरून गेल्याने मिश्रण खड्ड्याबाहेर पडू लागल्याने या मिश्रणाचे उंचवटे तयार होऊन खड्डे बुजण्याची प्रक्रिया यशस्वी झाली नाही. त्यामुळे सध्या इंदापूर ते वीर दरम्यान जिथे जिथे खड्डे बुजविण्याचा प्रयत्न झाला तिथे वाहनांना खड्डे आणि उंचवट्यांमधून वाट काढताना प्रचंड हेलकावे बसत असल्याचे सार्वत्रिक दृश्य दिसून येत आहे.

# जिल्ह्यात दुमदूमला हरिनामाचा गजर











**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात बुधवारी (दि.१७) आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. या निमित्त जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा, हातात टाळ मृदूंग, लेझीम घेऊन हरिनामाचा जप करीत गावागावात दींडी काढली होती. यातून पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रखुमाई व इतर संताची वेशभूषा करून सर्वांचे लक्ष वेधले. तसेच, विठ्ठल रूक्मिणी मंदिरात दर्शनासाठी भक्तांनी सकाळपासूनच रांगा लावल्या होत्या. जिल्ह्यात मंगलमय वातावरणात हा सोहळा साजरा करण्यात आला.



● आषाढी एकादशी निमित्त पनवेल मधील वसुंधरा फॉउंडेशनने पनवेल परिसरात वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लहान मूलं विठ्ठल रखुमाई बनले होते. तसेच, दिंडी मधील खेळ खेळण्यात आले होते.



● अलिबाग वरसोली मंदिरात बालकांनी पारंपारिक वेषात विठ्ठल रूक्मिणीचे दर्शन घेतले. सोबत आरसीएफ वुमन इंडस्ट्री को.सो. अध्यक्षा सुजाता कोळी व पालकवर्ग उपस्थित होता.




● दहिवली येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात अभिनव ज्ञान प्रबोधिनी एज्युकेशनल ट्रस्टच्या शारदा मंदिर मराठी माध्यमचे विद्यार्थी विठ्ठलाच्या भक्तीत तल्लीन झाले होते.



● सानपाडा येथील डिझनी किड्स प्रे प्रायमरी स्कूलतर्फे वारीचे आयोजन करण्यात आले होते. यात चिमुकल्या वारकऱ्यांनी उत्साहाने भाग घेतला होता.



● अलिबाग येथील अथर्व, आर्यन या जुळ्या भावंडांनी विठ्ठलाचे तर शांभवी हिने रूक्मिणीचे वेषांतर केले होते.





● कै.पू.न. गोडसे विद्यामंदिरात शाळेच्या प्रांगणातून विठ्ठल रखामाई आणि वारकरी विद्यार्थीनींसोबत दिंडीचे प्रस्थान झाले. संपूर्ण गावातून हरिनामाचा गजर करत भक्तीगीते म्हणत संपूर्ण गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.



● मुरुड जुनी पेठ येथील श्री भैरव विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भाविकांच्या रांगा.



● आषादी एकादशी निमित्त पनवेलच्या वि.खे.हायस्कूल शाळेतील विद्यार्थ्यांची दिंडी काढण्यात आली होती. यावेळी विठू माऊलीचा गजर सर्वत्र दरवळत होता.



● खालापूर तालुका शिक्षण मंडळाच्या शिशुमंदिर, प.पू.गगनगिरी स्कूल, इंग्लिश स्कूल तसेच जनता पूर्व प्राथमिक शाळेत विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, वासुदेव व अन्य संतांच्या वेशभूषा केल्या होत्या.



● नागोठण्यातील श्री ज्ञानेश्वर व विठ्ठल रूक्मिणी मंदिरात संत सेवा मंडळाच्यावतीने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



● कोकण एज्युकेशन सोसायटीच्या भिलजी-बोरघर येथील श्रीमती बामिबाई नाना पुनकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांच्या विठ्ठल नामाच्या जयघोषात दिंडी काढण्यात आली होती.



● जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था इंग्लिश मीडियम स्कूल मोरा तालुका उरणच्यावतीने आषाढी एकादशी मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली. यानिमित्त भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.



● मुरूड तालुक्यातील नांदगाव पंचक्रोशीत आषाढी एकादशी निमित्त वेशभूषा करून निघालेली मुला-मुलींची वारी.



● कर्जत शहरातील कर्जत महिला मंडळाचे विद्या विकास मंदिर या शाळेमध्ये आषाढी एकादशीनिमित्त दिंडीचे काढण्यात आली. माऊलीचा गजर करून वारकरी वेशातील विद्यार्थ्यांच्या अभंगवाणीने अवघे कर्जत शहर दुमदुमले होते.



● आषाढी एकादशीच्यानिमित्ताने कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीतील मराठी माध्यमाच्या नेरळ विद्या भवन माध्यमिक विद्यालयाच्यावतीने शाळा ते ग्रामदेवता मंदिर येथे धामोते पंचक्रोशीत पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

# विशाळगडाचा इशारा

विशाळगडच्या मुस्लिम वस्तीवर झालेला हल्ला व जाळपोळ ही महाराष्ट्राला लाज आणणारी घटना आहे. शाहू महाराजांचा वारसा सांगणाऱ्या कोल्हापूरच्या परिसरात हिंदू विरुध्द मुस्लिम असा संघर्ष पेटवण्याच्या या प्रयत्नाचा करावा तितका निषेध कमी आहे. दुर्दैवाने कोल्हापुरातल्याच काही राजकीय मंडळींनी या अतिरेकी व हिंसक लोकांना थारा दिलेला आहे. त्यामुळेच त्यांचे धाडस वाढत चालले आहे. पोलिसांनी आता शंभर लोकांवर गुन्हे दाखल केले आहेत. त्यांच्यावर थातूरमातूर कारवाई होईलही. पण मुळात वातावरण भडकवले जात असताना सरकार ज्या शांतपणे सर्व घडामोडी पाहत होते तो सर्वच संशयास्पद प्रकार आहे. विशाळगड व परिसरात दीडशेच्या वर अतिक्रमणे आहेत. ती हटवावीत अशी अनेक दिवसांपासूनची मागणी आहे. यातील काही प्रकरणे न्यायालयात गेलेली आहेत. पण बाकीची अतिक्रमणे हटवण्याला कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. सर्व संबंधित तसेच गावकऱ्यांना विश्वासात घेऊन यापूर्वीच तशी कारवाई सरकारने करायला हवी होती. मात्र ही अतिक्रमणे सर्वस्वी मुस्लिमांची आहेत असे वातावरण विविध हिंदू संघटना सातत्याने निर्माण करीत असतात. वास्तविक गेली दहा वर्षे या देशात, व मधला उद्धव यांचा काळ वगळला तर राज्यातही, भाजपचे सरकार आहे. ही अतिक्रमणे हटवण्यासाठी ते निवडणुकांची वाट पाहत होते काय? मुस्लिम मतांवर डोळा ठेवून काँग्रेस सरकारे हे करीत नाहीत असा खोटा प्रचार एरवी हिंदुत्ववादी करीत असतात. त्यांनी मोदी आणि फडणवीस व एकनाथ शिंदे यांना या नालायकीबाबत इतक्या दिवसात का जाब विचारला नाही हा खरा प्रश्न आहे. पण अशा प्रश्नांचे राजकारण करणे आणि हिंदुंच्या भावना भडकावणे हेच या हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्या लोकांचे कारस्थान आहे. भाजपला हे अत्यंत सोईस्कर असल्याने त्याचा यांना छुपा पाठिंबा असतो. काही वेळेला तर आतून फूस असावी की काय असा संशय घेण्यासारखी स्थिती असते.

## राजकारणाचा खेळ

विशाळगडाच्या घटनेत हे पुरेपूर दिसले आहे. लोकसभा निवडणुकांमध्ये भाजप राज्यात पार भुईसपाट झाला. कोल्हापुरात खुद्द मोदींनी सभा घेऊनदेखील भाजपचा पराभव झाला. काँग्रेसचे शाहू महाराज विजयी झाले. कोल्हापूरसह पश्चिम महाराष्ट्र काबीज करणे हे भाजपचे जुने स्वप्न आहे. मात्र यशवंतराव, वसंतदादा इत्यादींच्या मुशीत वाढलेल्या या परिसराने भाजपला व त्याच्या हिंदुत्ववादी विचारांना होता होईतो दूर ठेवले आहे. अलिकडे मात्र सांगली व साताऱ्यात त्यांनी पाय रोवला आहे. संभाजी भिडे नावाच्या उपद्रवी तसेच हिंसक विचारांचा प्रसार करणाऱ्या तथाकथित गुरुजींनी या भागातील तरुणांच्या मनात विष कालवले आहे. शिवाजी महाराज यांना हिंदूंचे पुढारी ठरवून ते जणू हिंदू विरुध्द मुस्लिम लढाई लढत होते असे त्यांचे चित्र हे भिडे उभे करीत असतात. जुन्या काळातील मुस्लिम राजांनी जी काय वाईट कृत्ये केली असतील त्याबद्दल अवतीभवतीच्या मुस्लिम समाजाला आज धडा शिकवण्याची भाषा करणे हे नीचपणाचे आहे. पण हा नीचपणा भिडे यांच्यासारखे लोक या तरुणांच्या मनात पेरत असतात. त्यातूनच मग कधी प्रतापगडाच्या आसपास तणाव निर्माण होतो तर कधी विशाळगडावर नासधूस होते. आज सरकार हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्यांच्या ताब्यात आहे. मुस्लिमांची अतिक्रमणे किंवा ज्या काय गुन्हेगारी कारवाया असतील त्या हाणून पाडण्यासाठी पोलिस आणि प्रशासनाचा वापर ते करू शकतात. प्रत्यक्षात प्रशासन व पोलिस बघ्याची भूमिका घेतील याची काळजी घ्यायची, जमाव जमवून तोडफोडीचे शौर्य गाजवायचे आणि मुस्लिमांना धडा शिकवला म्हणून शेखी मिरवायची हेच यांचे राजकारण आहे. मूर्ख हिंदू त्याला बळी पडत असतात. शिंदे, फडणवीस आणि मंडळींना निवडणुकीत त्याचा फायदा होत असतो. त्यामुळे तेही बराच काळ गप्प राहून या मंडळींना मोकळे रान देतात व सर्व झाले की कायद्यानुसार कारवाई होईल वगैरे पोपटपंची सुरु करतात. या लोकांचा हिंदू मतांच्या राजकारणाचा हा खेळ महाराष्ट्राने आता बंद पाडायला हवा.

## संभाजीराजांसाठी काही प्रश्न

या राजकारणात संभाजीराजे यांच्यासारखे सुबुध्द नेतेही कळत-नकळत सामील होतात हे दुर्दैवी आहे. अतिक्रमणांविरोधात त्यांनी जाहीर आवाज उठवला. ती हटवण्यासाठी आंदोलन करण्याचा इशारा दिला. या आंदोलनाचा फायदा घेऊन पुणे व इतर भागातील कार्यकर्ते तिकडे गेले. यातून तणाव निर्माण होणार हे ठाऊक असूनही पोलिसांनी त्यांना खुशाल गडावर जाऊ दिले. तिथे त्यांनी दंगल केली. शेकडो वर्षांपासून उभ्या असलेल्या मशीद व दर्ग्यात तोडफोड केली. गडाच्या पायथ्याशी असलेल्या गजापूर येथील मुस्लिमवाडीतील लोकांचा या प्रश्नाशी संबंध नाही. तरीही त्यांची घरे, दुकाने, वाहने इत्यादींना नेम धरून फोडण्यात आले. संभाजीराजे व अन्य नेत्यांनी या प्रकारचा तात्काळ व तीव्र निषेध करणे अपेक्षित होते. त्यांनी या परिसराला भेट देऊन दंगलग्रस्त नागरिकांना दिलासा द्यायला हवा होता. या अतिक्रमणांमध्ये हिंदू व मुस्लिम अशा दोहोंचीही अतिक्रमणे आहेत असे ते आता सांगत आहेत. पण मग मुस्लिमवाडीतील निरपराध नागरिकांवर हल्ला का झाला याचे उत्तर त्यांनी द्यायला हवे. आपली संदिग्ध भूमिका दंगेखोरांना पाठीशी घालते हे त्यांनी लक्षात घ्यायला हवे. या वाडीतील नुकसानीची भरपाई सरकारने न केल्यास आपण करू असे काँग्रेसचे स्थानिक आमदार सतेज पाटील यांनी जाहीर केले आहे. ते स्वागतार्ह आहे. मात्र कोल्हापूरला गिळणाऱ्या या हिंदुत्वाच्या कर्करोगावरही आता दीर्घकालीन व जालीम इलाज करण्याची वेळ आली आहे. गेल्या वर्षी औरंगजेबाचा फोटो कोण्या एका पोराने मोबाईलमध्ये ठेवला या कारणावरून कोल्हापुरात दंगल घडवण्यात आली. त्यावेळीही दंगेखोर बाहेरून आले होते असे कारण दिले गेले. या बाहेरून येणाऱ्यांचा व त्यांना आणणाऱ्यांचा बंदोबस्त कसा करायचा हा खरा प्रश्न आहे. यंदा लोकसभेपूर्वी अकोला व संभाजीनगरात वातावरण पेटवण्यात आले. ते पाहता विधानसभा निवडणुकांपूर्वी आणखी ठिकाणी असे प्रकार घडण्याची शक्यता आहे. काँग्रेससह सर्व पक्षांनी ते रोखायला हवेत.

विचार

# ब्रिटनमधील सत्तांतराचा भारतासाठी संदेश

***ब्रिटनमध्ये हुजूर पक्षाला लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले. हुजूर पक्षाच्या कार्यकाळात घडलेले एकामागून एक घोटाळे मोठ्या पराभवाला कारणीभूत ठरले. गेली १४ वर्षे सत्तेत असणाऱ्या या पक्षाच्या कारभाराला जनता कंटाळली होती. अर्थात पराभवामागे अन्य कारणेही आहेत. या कारणांचा वेध घेत ताज्या सत्तांतराचा भारतावर काय परिणाम होईल, हे तपासून पाहण्याचा केलेला प्रयत्न.***

**श्रीकांत परांजपे**

भारतात २००४ मध्ये लवकर निवडणूक घेण्याची घाई अटलबिहारी वाजपेयी यांना नडली, तशीच ती भारतीय वंशाच्या ऋषी सुनक यांना ब्रिटनमध्ये नडली. इकडे 'शायनिंग इंडिया' मोहीम भाजपच्या उपयोगी पडली नाही तशी तिकडे 'सुनक इकॉनॉमी' हुजूर पक्षाला तारू शकली नाही. ब्रिटनच्या निवडणुकीतील त्सुनामीने सुनक यांच्या पक्षाची वाताहात झाली. त्यांच्या हुजूर पक्षाचा दारुण पराभव झाला. ६५० पैकी ४१२ जागा जिंकून ब्रिटनमध्ये मजूर पक्षाने १४ वर्षांनंतर जोरदार पुनरागमन केले. मजूर पक्षाच्या त्सुनामीत सुनक यांच्या हुजूर पक्षाला १२१ जागा मिळाल्या. सुनक यांनी उत्तर इंग्लंडमधील रिचमंड आणि नॉर्थलर्टन जागा जिंकली.

सुस्त अर्थव्यवस्था, ढासळत चाललेल्या सार्वजनिक सेवा आणि घसरलेले जीवनमान यासारख्या कठीण आव्हानांना तोंड देत कीर स्टार्मर यांचा मजूर पक्ष सत्तेवर आला आहे. त्याच्या झंझावातामध्ये हुजूर कुठेही टिकू शकले नाहीत. सुनक यांच्या लोकप्रियतेचा आलेख घसरण्यामागे बेकायदेशीर घुसखोरी रोखण्यात आलेले अपयश, कोरोना महामारीच्या काळात कमकुवत झालेली अर्थव्यवस्था मजबूत करण्यात आलेली असमर्थता, स्थलांतराच्या मुद्द्यावर मजूर पक्षाच्या धोरणांना पाठिंबा नसणे आदी कारणे आहेत. सुनक भारतीय वंशाचे असल्याने अनिवासी भारतीयांना अभिमान होता. पण मतदानाचा विषय आला तेव्हा भारतीयांनी या भावनिकतेऐवजी परिवर्तनाला मतदान केल्याचे मानले जाते. हुजूर पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारच्या १४ वर्षांच्या कारकिर्दीमुळे उद्भवलेली निराशा या पराभवाचे कारण मानली जात आहे.

श्री. स्टार्मर चार वर्षे विरोधी पक्षाचे नेते होते. हुजूर पक्षाचे अपयश आणि त्याविरुद्धचा रोष त्यांनी जवळून पाहिला आणि पक्ष बळकट करण्यासाठी त्याचा उपयोग केला. त्यांच्या मजूर पक्षाने सत्ता आणि अर्थव्यवस्थेच्या स्थैर्यासाठी मजूर पक्षाला मतदान करावे, असा नारा दिला. एखाद्या संघाने सामन्यापूर्वीच पराभव स्वीकारला तर ते समर्थकांचे मनोबल पूर्णपणे खच्ची करते तसेच हुजूर पक्षाबाबतीत झाले. मतदानाच्या तारखेच्या खूप आधी हुजूर पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी विजयाची आशा सोडली होती. प्रचंड बहुमताने सत्तेची कमान मजूर पक्षाकडे सोपवू नका, असे आवाहन ते मतदारांना करत होते. थोडक्यात, हुजूर पक्ष सत्तेत येण्याची भाषा करत नव्हता तर प्रबळ विरोधी पक्ष होण्याचीच भाषा करत होता. त्यामुळे कार्यकर्त्यांनीही जणू निवडणूक त्वेषाने लढवली नाही. हुजूर पक्षाला गेल्या अनेक दशकांमधील सर्वात लाजिरवाण्या पराभवाला का सामोरे जावे लागले, हा प्रश्न चर्चिला जात आहे. हुजूर पक्षाच्या इतक्या मोठ्या पराभवामागे एकामागून एक घोटाळे हे मुख्य कारण आहे. त्यामुळे त्यांच्यावरील लोकांचा विश्वास कमी झाला. गेल्या १४ वर्षांपासून जनता त्यांना कंटाळली होती. मुख्य म्हणजे बहुतांश घोटाळे अलीकडच्या काळातच उघडकीस आले. कोविड-१९ साथीच्या आजाराप्रसंगी हुजूर पक्षाने केलेल्या कामाबाबतही प्रश्न उपस्थित केले गेले. तत्कालीन पंतप्रधान बोरिस जॉन्सन आणि त्यांच्या सरकारच्या मंत्र्यांनी टाळेबंदी नियमांचे उल्लंघन केले. वाद वाढत गेल्याने जॉन्सन यांच्या जागी लिझ ट्रस यांना पंतप्रधान करण्यात आले; परंतु त्यांची आर्थिक धोरणेही टिकेला कारणीभूत ठरली. लिझ ट्रस केवळ ४० दिवसच पंतप्रधानपदी राहू शकल्या. यानंतर भारतीय वंशाचे पहिले ब्रिटिश पंतप्रधान ऋषी सुनक यांनी सत्ता हाती घेतली. पण सुनक यांचे सरकार आर्थिक संकट, महागाई आणि बेरोजगारी यासारख्या आव्हानांशी संघर्ष करत राहिले. अलीकडेच उघडकीस आलेल्या एका घोटाळ्यात तर सुनक यांच्या जवळचे लोक आणि त्यांच्या सरकारचे सदस्यही सामील झाल्याचे समोर आले. एकंदरच अंतर्गत कलह आणि नेतृत्वात वारंवार होणारे बदल यामुळे सरकारची अवस्था दयनीय झाली.

विरोधी पक्षनेते स्टार्मर यांनी मजूर पक्ष पूर्णपणे बदलला. जेरेमी कॉर्बिन मजूर पक्षाचे नेते होते, तेव्हा भारत त्यांच्यावर खूप नाराज होता. आता भारतासोबतचे संबंध सुधारणे हे स्टार्मर यांच्यापुढील एक आव्हान आहे. सुनक यांना इच्छा असूनही भारताशी व्यापार करार करता आला नाही. २०१९ च्या वार्षिक बैठकीत मंजूर झालेल्या एका ठरावात काश्मीरमध्ये मानवतावादी संकट निर्माण झाल्याची टीका करण्यात आली होती. काश्मीरला स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळावा, यावरही या ठरावात भर देण्यात आला होता. भारताने या प्रस्तावाला विरोध केला होता. तेव्हा मजूर पक्षाचे नेते कीर स्टार्मर यांनी स्पष्ट केले होते की काश्मीर हा भारत आणि पाकिस्तानचा अंतर्गत प्रश्न आहे. तेव्हाच त्यांनी भारतासोबतचे संबंध सुधारणार असल्याचे आश्वासनही दिले होते. आता ते हे आश्वासन कसे पार पाडतात हे बघावे लागेल. गेल्या संसदेत मजूर पक्षाचे भारतीय वंशाचे सहा खासदार होते. या वेळी ही संख्या दुपटीने वाढली आहे. ब्रिटनमध्ये भारतीय वंशाचे सुमारे १५ लाख लोक राहतात. तिथे सुमारे १२ लाख पाकिस्तानी वंशाचे लोकही राहतात; याशिवाय ब्रिटनमध्ये भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या संघटना सक्रिय आहेत. याशिवाय जगातील व्यापक राजकीय आणि भू-राजकीय बदलांचाही भारत आणि ब्रिटनच्या संबंधांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. तेव्हा तो टाळून भारत आणि ब्रिटनमधील संबंधांमध्ये उच्च पातळीवर सातत्य राहील, अशी अपेक्षा करावी लागेल.

### नव्या राजवटीची नवलाई

**मोठ्या पटलावरुन बघायचे तर इंग्लडमधील कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या समस्या मुळात इंग्लडच्या समस्या आहेत. खऱ्या अर्थाने ब्रेग्झिटनंतर त्या सुरू झाल्या. ब्रेग्झिटचा आग्रह कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचाच होता. युरोपियन युनियनने आमचे सार्वभौमत्व घालवले, आम्हाला युरोपिय युनियनच्या अधिपत्याखाली राहायचे नाही, ही त्यांची आधीपासूनची भूमिका होती. पण खरी समस्या स्थलांतरितांचीही होती. मात्र युरोपियन युनियनमध्ये राहिल्यास स्थलांतरितांना नाकारण्याचा मुद्दाच नव्हता. त्यामुळेच स्थलांतरितांच्या या प्रश्नावरुनच ब्रेग्झिटची संकल्पना पुढे आली आणि राबवली गेली. पण इंग्लडच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे विपरित परिणाम झाले आणि वाढत गेले. त्यामुळे ब्रेग्झिटनंतर इंग्लडच्या आर्थिक डबघाईला सुरूवात झाली. दरम्यान, आलेल्या वेगवेगळ्या पंतप्रधानांनी बरेच प्रयत्न करुनही आर्थिक आव्हाने पेलता आली नाहीत. ऋषी सुनक हे याच पंतप्रधानांच्या मांदियाळीचा एक भाग होते. त्यांनी ब्रिटीश राष्ट्राच्या हिताचेच निर्णय घेतले. पण या निवडणुकीत त्यांच्या पक्षाचा दारुण पराभव झाला. इथे लक्षात घेण्याजोगी महत्त्वाची बाब म्हणजे ब्रिटनला अमेरिकेची प्रचंड गरज आहे. अमेरिकेशी कायम चांगले संबंध ठेवणे त्यांच्यासाठी गरजेचे असते. त्यामुळेच अमेरिकेच्या भूमिकेला हो म्हणणे आणि ती राबवणे हा ही तितकाच महत्त्वाचा भाग आहे. या निवडणुकीमध्ये संसदेत लेबर पार्टीचे पुनरागम झाले पण लिबरल फ्रंटही बऱ्यापैकी पुढे आला. त्यामुळे संसदेमध्ये मोठे अधिक्य असले आणि त्या बळावर काही गोष्टी मारुन नेऊ शकणार असले तरी लेबर पार्टीला बऱ्याच आव्हानांना सामोरेही जावे लागणार आहे. नवीन पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी सुरुवातीला स्पष्ट केलेल्या दोन गोष्टींमधून याची स्पष्टता मिळत आहे. यातील पहिली बाब म्हणजे आधी त्यांना अमेरिकेत जाऊन नमस्कार करावा लागेल. त्यामुळे त्यांची पहिली परराष्ट्र भेट अमेरिकेला असणार हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. नंतर ते युरोपियन राष्ट्रांना भेटतील. आता नवीन पंतप्रधानांना ब्रेग्झिटबद्दल बोलता येणार नाही, कारण एकदा बाहेर पडल्यानंतर युरोपियन युनियनमध्ये परत जाणे कठीण आहे. पण तरीही त्यांच्याकडून काही तरी वेगळे पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न नक्कीच केला जाईल. विशेषत: व्यापाराच्या संदर्भात बोलणी होतील. आता वेगळे सरकार आहे आणि आम्ही वेगळ्या भूमिकेनिशी बोलू, असे ते सांगू शकतात. भारताबरोबर नीट सुधारण्याचा विचारही त्यांच्या धोरणांद्वारे स्पष्ट होत आहे. आपण काश्मीर प्रश्नासंदर्भात सजग असल्याचे सांगत त्यांनी ही बाब दाखवून दिली. खरे तर आज भारतापेक्षा ब्रिटनला व्यापार मुक्त करण्याची अधिक गरज आहे. त्यामुळेच भारत या स्थितीचा फायदा करुन घेऊ शकतो. अर्थात असे असले तरी नवीन राजवटीची धोरणे मूळ धोरणांपेक्षा फार वेगळी नसतील. परराष्ट्र धोरणांमध्ये पडू शकणारा एक फरक म्हणजे युक्रेनविषयक प्रश्नाची तीव्रता कमी होण्याची शक्यता आहे. थोडक्यात, आता दोन पावले मागे जाऊन आपण तडजोड करायला तयार आहोत, अशी युरोपियन युनियनबाबतची भूमिका निर्माण होऊ शकते.**

आजकाल

# कशी खेडकरांनी थट्टा आज मांडली

**रोहन नामजोशी**

आद्य सनदी अधिकारी श्रीमती पूजा खेडकर यांचे पूज्य पिताश्री दिलीपराव (की दिलीप) खेडकर यांची न्यूज १८ लोकमतवर मुलाखत बघत होतो. अहाहा काय मुलाखत.. मुलाखकाराने खूप मोठा शोधपत्रकार असल्याचा 'बढेजाव' केला पण एकदम सरपट्टी बॉल टाकून सगळा कचरा केला. ठीक आहे मी समजू शकतो.

तर हे पप्पा म्हणतात की, पूजा वैद्यकीय चाचणीला गेली नाही कारण तिला डोळ्यांचा कोव्हिड झाला होता. हो य असं म्हणाले आहेत ते. आधी वाटलं चुकून म्हणाले आहेत. पण ते नंतर त्यावर एखाद मिनिटं व्यवस्थित बोललेही आहेत. (१६:३८ वर न्या.) फार गैरसमज झाले आहेत म्हणे. आजारी होती ती. तिचा फोन बंद होता त्यामुळे तिच्यापर्यंत मेसेज गेला नाही. त्यांनी एकही मेल किंवा मेसेज पाठवला नाही म्हणे. ते का पाठवतील? त्यांना व्हायचं होतं का आयएएस? अरेरे किती वाईट ना... एवढी महत्त्वाची चाचणी असताना आपण फोन स्विच ऑफ करून ठेवतो. मस्त दिलीप काका. शासनाने तर मला वाटतं तिच्या आरोपांवर चौकशी करण्याआधी डोळ्याच्या कोव्हिडवर एक समिती बसवावी.

त्याआधी ते म्हणतात की, ''जेव्हा मुलं एकमेकांना भेटतात तेव्हा ते सांगतात की अरे मला डोळ्यांचं असं आहे, कानाचं असं आहे. मी हे सर्टिफिकेट घेतलं. त्यामुळे हा काही नवीन प्रकार नाही.'' पूजाच्या बाबतीत बोलताना ते म्हणाले की तिला लक्षात आलं की आपल्या डोळ्याचा नंबर जास्त आहे, एका विशिष्ट अँगलने दिसत नाही, ते न दिसल्याने तोल जातो. त्यामुळे मग तिने ही सर्टिफिकेट घेतलं. किती छान.. आता ही मुलगी डॉक्टर आहे. हिला खरंच असं असेल असं आपण गृहित धरूया.मग हे सगळं युपीएससीच्या परीक्षेतच का जाणवलं?. किती टक्के दिसत नसलं की अपंगत्व समजलं जाते हे आधीच्या अटेम्प्ट मध्ये माहिती नव्हतं?

असणारी व्यक्ती जिल्हा कसा सांभाळू शकतो या प्रश्न त्यांनी व्यवस्थित घुमवला. अरे काका, कायदा आम्ही पण वाचला आहे. इतकंही बुद्धू नका समजू हो लोकांना. जी व्यक्ती या सगळ्या मांडवातून गेली आहे. त्याने फक्त शासनाच्या साईटवर जाऊन माहिती शोधली ना सगळं व्यवस्थित कळतं. उदा. २०२१ मध्ये पूजा यांची निवड म्हणजे या प्रवर्गातून स्पोर्टस अथॉरिटी ऑफ इंडिया या संस्थेत झाली होती. त्याच वर्षी त्यांनी सिव्हिल सर्व्हिस दिली त्यात त्यांचा ६७९ रँक होता. ती या प्रवर्गात निवड झाली. एका वर्षात इतकं अपंग कोण होतं? हे तर हिमनगाचं टोक आहे,असे अनेक मुद्दे आहेत.

या संपूर्ण कुटुंबाने सध्या पूर्ण व्यवस्थेला येड्यात काढलं आहे. थेट युपीएससीलाच घोळात घेतलं तर इतरांची काय कथा? पोलीस काय नोटिसा लावतात, पोलीस त्यांना शोधत असताना हे काका मस्त माध्यमांना मुलाखती देत आहेत. आई लोकांना हाकलते काय..रोज नवेनवे सर्टिफिकेट समोर येताहेत. काय थट्टा चालवलीय राव... म्हणजे आम्हाला अपंग म्हणा याचा किती अट्टाहास. यामुळे ज्यांना खरंच काही त्रास आहेत त्यांच्यावर किती अन्याय होईल. मागे एका नेत्रहीन आयएएस अधिकाऱ्याची मी स्टोरी केली होती. तिचा स्ट्रगल पाहून इतकी लाज वाटली होती स्वत:ची. हेडफोन लावून पुस्तकं ऐकले होते. ते ऐकून कान इतके दुखले की काय सांगू असं ती म्हणाली होती.

आज ट्विटरवर एक थ्रेड वाचला, अशा प्रकारचे खोटे आरक्षणं घेऊन सेवेत असल्यांची यादीच दिली आहे एकाने. केंद्रीय लोकसेवा आयोग ही एक घटनात्मक संस्था आहे.

तिचे नियम, कायदे त्यांचा काय रुबाब आहे. कधीही त्या धोलपूर हाऊसच्या समोरून गेलं की एकदम भारी वाटतं. त्यांना हे सगळं खरंच दिसत नसेल का? तिथे काम करणारे प्रशासनात इतकी वर्षं मुरलेले अधिकारी असतात.

त्यांना हे सगळं कळत नसेल? सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे जे लोक यातलं काहीच करू शकत नाही त्याने काय करायचं? वडील जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन लोकांना धमकावतात? अरे ती काय शाळा आहे का? माझ्या मुलाला का चिडवलं हा जाब विचारण्यासाठी?

लोकसंसद

## पाच वर्षात ७० परीक्षांचे पेपर फुटले ...

नीट परीक्षांच्या घोटाळ्यानंतर त्याची चौकशी अनेक स्तरावरून चालू आहे. सुमारे दोन तीन दशकापूर्वी असे पेपरफुटीचे प्रकार होत नसत. परीक्षा पारदर्शकपणे पार पडत. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. अनेक पालक सुद्धा परीक्षेच्या अगोदर महत्वाच्या प्रश्नांचा संच किंवा महत्वाचे प्रश्न अशा विषयाकडे वळत आहेत. अनेक ठिकाणी सुपरवायझर्स सामील असतात तर काही ठिकाणी परीक्षेच्या अगोदर पेपर्स वाटसअप वर कसे दिसतील हे अनेक जण पाहत असतात एका अंदाजानुसार २०१९ पासून म्हणजेच गेल्या सुमारे पाच वर्षात जवळपास ७० परीक्षांचे पेपर्स फुटल्याच्या बातम्या आहेत. ही बातमी नुकतीच वाचली. भारतीय लष्कर सामायिक प्रवेश परीक्षा, २०२१, संयुक्त प्रवेश परीक्षा २०२१, केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा, २०२३ अशा अनेक महत्वाच्या परीक्षांचे पेपर्स फुटलेले होते. जे विध्यार्थी मनापासून अभ्यास करतात त्यांच्यावर या पेपरफुटीचा परिणाम होतो. प्रत्येक वेळी सरकार याची चौकशी करते. पण पुन्हा परीक्षा आल्या की पेपर्स लीक झालेले पाहावयास मिळतात एक काळ असा होता की लोक त्वरित निकाला मिळविण्यासाठी विविध प्रकारांचा वापर करीत असत. आज लोक परीक्षेचा पेपर अगोदर कसा मिळेल याची वाट पाहत असतात. पेपरफुटीचे हे दुष्टचक्र केव्हा नष्ट होणार

**- शांताराम वाघ, पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१८ जुलै**

**१८९४:-** कायद्यांचे भाषांतरकार आणि मुंबई हायकोर्टाचे पहिले नेटिव्ह न्यायाधीश जनार्दन वासुदेव आगासकर यांचे निधन. 'दर्पण' या वृत्तपत्रात ते काही काळ होते. तसेच इंग्रजी कायदेकानूनचे त्यांनी मराठीत भाषांतर केल्याचे उल्लेख आढळतात. **१९१८:-** 'स्त्री', 'आनंद', 'शालापत्रक', 'मुलांचे मासिक' आदी नियत- कालिकांतून मुलांसाठी लेखन करणाऱ्या लेखिका, बालसाहित्यिका नलिनी शंभुराव देवळे यांचा जन्म. 'अशी झाली लढाई' हे १९६५च्या भारत पाक लढाईची मुलांसाठी कथा तसेच 'एकदा अशी एक मजा झाली', 'कळीचा नारद', 'जिवलग मित्र', 'लताचा छब्या' ह्या त्यांच्या बालकथा. 'व्रतांच्या कथा भाग १,२,३','हिमालयासम आमुचे वीर भाग १,२,३', 'अमोल ठेवा मधून वन्य पशूच्या कथा', 'आपण सारे एक', 'हे सारे सुखासाठी' हे नवसाक्षरासाठी याशिवाय गंधर्व रानाची कथा', 'विषाचे अमृत झाले' हे भक्त प्रल्हादावर', 'दोन बहिणी' ही अद्भूत कादंबरी अशी विपूल साहित्य संपदा त्यांच्या नावावर आहे. १९२० :कथा, कादंबरी, नाटककार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. घरची परिस्थिती अत्यंत प्रतिकूल आणि त्यात जन्म मागास जातीत. त्यामुळे वर्णव्यवस्थेचे चटके भोगत अण्णांची जीवनघडण होत होती. अण्णांचे शिक्षण जेमतेम लिहितावाचता येईल एवढेच. पुढे मुंबईत एका गिरणीत कामाला लागले. तेथे त्याचा साम्यवादी चळवळीशी संबंध आला. साम्यवादी तत्वज्ञान प्रत्यक्षात ते जगले असल्याने त्याचे प्रतिनिधीत्व कळतनकळत त्यांच्या साहित्यात उतरले. त्याची भुरळ अवघ्या महाराष्ट्राला पडली. 'माझी मैना गावाकडं राहिली' यासारख्या ठसकेबाज लावण्या आणि फकिरा, वारणेचा वाघ सारख्या कादंबऱ्या लिहिणाऱ्या अण्णांनी लेखनाची सुरुवात पोवाडयांनी केली. त्यांचा स्टालिनग्राडचा पोवाडा गाजला. पोटासाठी तमाशात प्रवेश केला. १९४२ च्या चळवळीत सहभागी झाले. तथापि अण्णांना महाराष्ट्राने डोक्यावर घेतले ते संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत. पुढे आंबेडकरांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव पडला. जग बदल घालूनी घाव । सांगूनि गेले मज भीमराव'। हे त्यांचे गाजलेले गीत तर फकिरातून भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या रणागंणात १०५ दलितांच्या वतीने लढणारा नायक त्यांनी उभा केला. 'रत्ना, रुपा, गुलाम, मिळून ३५ कादंबऱ्या, निखारा, पिसाळलेला माणूस, मिळून १३ कथासंग्रह, ११ लोकनाट्य व चित्रपट कथा आणि फक्कड लावण्याही त्यांनी लिहिल्या. याशिवाय माझा रशियाचा प्रवास हे प्रवासवर्णनपर पुस्तकही त्यांच्या नावावर जमा आहे. 'लालबावटा' कलापथकाची स्थापना करणाऱ्या अण्णाच्या काही गाजलेल्या कला कृतीत माझी मुंबई, 'खापऱ्या चोर' ही लोकनाट्ये, आग, अहंकार, गुऱ्हाळ या कादंबऱ्या, 'फरारी, पिसाळलेला माणूस,' गजाआड हे कथा संग्रह महत्वपूर्ण आहेत. आयुष्याच्या अखेरीस मात्र त्यांच्या नशिबी उपेक्षाच आली.कलापथक बंद पडले. कम्युनिस्ट पक्षात त्यांची अवहेलना सुरु झाली. आणि ते एकाकी पडले. हा उपेक्षितांचे अंतरंग जाणणारा साहित्यिक १८ जुलै १९६९ रोजी काळाच्या पडद्याआड गेला. **१९३९:-** कवी दौलत सावजी बोरकर यांचा जन्म. 'गुढी', 'तोरण', 'विरह' ह्या काव्यसंग्रहासह 'बंधू भगिनींनो' हे भाषणसंग्रह आणि 'पाकळी', 'स्वागत सुमने','वैनाकाठच्या कथा' हे संपादित ग्रंथ त्यांचे प्रकाशित झाले आहे. **१९४०:-** लेखक डॉ. भगवान शिवराम भोयर यांचा जन्म. 'चुलभनच्या कथा' ह्या कथा संग्रहासह 'रोवणी', 'फुलोर', 'संजोरी' हे काव्यसंग्रह प्रसिध्द. तसेच काही संपादन त्यांच्या नावावर आहे. **१९४१:-** नाटककार, लेखिका कवीयत्री निक्षुभा नंदकुमार जोशी यांचा जन्म. त्यांच्या प्रकाशित ग्रंथात 'लाज राखली कशी' या नाटकासह 'सुख येई ओसंडुनी', 'श्रीदेवी कवन गुच्छ','श्रीकृष्णाजी दृष्टी (कविता) तसेच केवळ सत्यासाठी', 'चिंधी प्रेमाची','शिवपदासाठी नाचीन मी','वज्रचुडयांचे दान' अशी नाटके त्यांच्या नावावर आहेत. **१९४७:-** लेखिका शुभदा मुळे यांचा जन्म. 'कस्तुरीमृग' या पुस्तकासह 'स्वरुपआकार', 'भिरभिर' हा कथासंग्रह त्यांचा प्रसिध्द झाला आहे. **१९४८:-** कवी गजेंद्र अंताराम गजभिये यांचा जन्म. ह्यांचे 'रसगंधा','घाव आणि एस एस डी ललकार' हे काव्यसंग्रह त्यांचे प्रकाशित झाले आहे. १९६८:- प्रसिध्द कवी, गीतकार, कथाकार गुरु ठाकूर यांचा जन्म. 'नटरंग', 'घर दोघांचे', 'अगबाई अरेच्चा', 'टाइमपास' यासारख्या चित्रपटांसाठी त्यांनी गीतलेखन केले. **१९६९:-** ३ ५ कादंबऱ्या, त्यापैकी ७ कादंबऱ्यांवर लोकप्रिय चित्रपट, बर्लिन-लेनिनग्राड आदी शहरांतील ताज्या संघर्षांसह १५ नावीन्यपूर्ण विषयांवर पोवाडे, १३ कथासंग्रह, 'मुंबईची लावणी', 'माझी मैना गावावर राहिली' सारख्या सामाजिक भान आणि कलात्म शृंगार जपणाऱ्या लावण्या, ११ लोकनाट्ये यांतून प्रकटलेल्या सशक्त लोकाभिमुख प्रतिभेचे 'लोकशाहीर' तुकाराम भाऊराव उर्फ अण्णा भाऊ साठे यांचे निधन. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयात आणि कामगार व उपेक्षितांच्या चळवळीत 'अण्णाभाऊ'नी महत्त्वाची भूमिका बजावली. **१९७४:-** यंत्रशास्त्राच्या मूलतत्त्वांवरील पुस्तक, तसेच 'वाहती वीत' हे पुस्तक लिहून शास्त्रीय परिभाषेचा पाया रुंदावणारे सखाराम विनायक आपटे यांचे निधन. **१९७६:-** लेखिका डॉ. वीरा पवन मांडवकर यांचा जन्म. ह्यांच्या साहित्यसंपदेत 'गृहिणी साठी टॉप टिप्स','मंजुळगाणे','दुखाणे ओंजळ' हा काव्यसंग्रह, 'गंधाली' ह्या चारोळी संग्रहाचे संपादन आणि 'सिंधू' या गौरव ग्रंथाचे संपादनासह 'स्वप्नफुले' हा कथासंग्रही त्यांच्या नावावर आहे. **१९८९:-** नाटककार, नाट्यविषयक लेखक गोविंद केशव भट यांचे निधन. 'कालिदास दर्शन', 'भवभूती', 'संस्कृत नाटके आणि नाटककार' आदी पुस्तके, 'गृहदाह' हे नाटक व २ कथासंग्रह, एक कादंबरी त्यांच्या नावावर आहे.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१८ जुलै

१) श्रीम. सुहासिनी रोहिदास म्हात्रे
आवास-पाडा, अलिबाग
१८-०७-१९४५

२) श्रीम.सुमती प्रभाकर दांडेकर
पोयनाड, अलिबाग
१८-०७-१९४९

३) श्री. अरुण रघुनाथ भितळे
गोंधळपाडा, वेश्वी
१८-०७-१९५५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**विमल सॉ मिल**
**उचेडे- पेण**

# रेल्वे स्थानकांची नावे बदलणार

**। उरण । वार्ताहर ।**

मुंबईतल्या अनेक रेल्वे स्थानकांची जुनी नावे बदलण्याची शिफारस करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. विशेष म्हणजे या रेल्वे स्थानकांची नावे बदलली जावीत अशी मागणी करणारे आंदोलन वगैरे कुणीही केलेले नसताना ती करण्याची शिफारस केली जात आहे. मात्र उरण तालुक्यातील अनेक रेल्वे स्थानकांना दिलेली चुकीची नावे बदलण्यात यावीत अशी मागणी करणारी अनेक आंदोलने उरणकरांनी केली. मात्र, त्याकडे राज्य शासन स्थानिक लोकप्रतिनिधी कोणीही लक्ष देत नसल्याची खंत उरणकरांमध्ये आहे.

उरणच्या द्रोणागिरी रेल्वे स्थानकाला स्थानिक गाव असलेल्या बोकडविरा गावाचे नाव देण्याची मागणी आहे. नवघर गावाजवळ असलेल्या रेल्वे स्थानकाला न्हावा-शेवा असे नाव देऊन रेल्वेने स्थानिकांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. रांजणपाडा गावाच्या नव्हे तर सर्वाधिक मौजे धूतूम गावाच्या जमिनीवर वसलेल्या रेल्वे स्थानकाला देखील रेल्वेने रांजणपाडा असे नाव दिलेले आहे. ते बदलावे यासाठी मोठ मोठी आंदोलने गावकऱ्यांनी केली मात्र आजतागायत त्यावर रेल्वेने कोणताही निर्णय घेतलेला नाही.




अशा स्थितीत मुंबईतील मागणी नसताना देखील रेल्वे स्थानकांची नावे बदलण्याचा निर्णय घेत राज्य सरकारने तशी शिफारस देखील केली असल्याची माहिती प्रकल्पग्रस्त स्थानिकांपर्यंत पोहोचताच भूमि पुत्रांमध्ये कमालीचा असंतोष पसरला आहे. राज्य शासन जर मुंबईची निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन तेथील स्थानकांची नावे बदलत असेल तर उरणकरांनी काय घोड मारल आहे, असा जळजळीत सवाल उरणच्या स्थानिक भूमिपुत्रांकडून विचारला जात आहे.

द्रोणागीरीचे नाव बदलून बोकडविरा देण्यासाठी ग्रामपंचायत बोकडविरा ने सर्व ग्रामस्थांना घेऊन आंदोलन केले होते. नवघर असे नाव न्हावा शेवा स्थानकाला द्यावे यासाठी देखील ग्रामस्थांनी अगदी टोकाचे आंदोलन केले होते. धुतूमसाठी देखील ग्रामपंचायत आणि सर्व ग्राम स्थांनी आंदोलन केले होते. मात्र यापैकी कोणत्याही आंदोलनाची रेल्वेने आजतागायत दखलच घेतली नाही. विशेष म्हणजे राज्याच्या अधिवेशनात मुंबईतल्या काही स्थानकांची नावे बदलण्याबांबत केंद्राला शिफारस करण्याचा निर्णय घेतला जात होता. त्यावेळी उरणचे लोकप्रतिनिधी काय करत होते असा सवाल या निमित्ताने विचारला जात आहे. त्यांना स्थानिकांची रेल्वे स्थानकांची नावे बदलायला हवीत ही मागणीच माहीत नाही की काय असेही या निमित्ताने विचारले जात आहे. राज्य सरकारने मात्र मुंबईतल्या काही रेल्वे स्थानकांची ब्रिटीश काळातील नावे बदलण्यासाठी शिफारस करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे उरण तालुका हा महाराष्ट्रात नाही का असा सवाल आहे.

# रायगड प्रेस क्लबच्या उपक्रमाला १६ वर्षे पूर्ण

### शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांचा केला सन्मान



**। रोहा । वार्ताहर ।**

रोहा प्रेस क्लबच्यावतीने नुकतेच प्रयोगशील युवा शेतकरी रतीश मगर (रा.घोसाळे) आणि केशव खरिवले (रा.सांगडे) यांना त्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन सन्मानपत्र, शाळ, श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी आज शेती व्यवसायापासून दूर जातोय हे वातस्व असतानाच रायगड जिल्ह्यातील पत्रकारांची संस्था रायगड प्रेस क्लब, रोहा प्रेस क्लबने अभिनव उपक्रम सुरू केला. बळीराजाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष स्व.संतोष पवार यांची संकल्पना, प्रेस क्लबच्या माध्यम ातून जिल्ह्यातील कृतिशील प्रगत आणि शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचा सन्मान त्यांच्याच शेताच्या बांधावर जाऊन दरवर्षी केला जातो. दरम्यान, कृतिशील शेतकऱ्यांचा सन्मान रोहा प्रेस क्लब पत्रकारांनी केल्याने शेतकरी संघटना, कृषी विभाग व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कृतज्ञता व्यक्त केली, तर हा पुरस्कार शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान, संधी यांना अधिक प्रोत्साहन देणारे आहे अशी भावना आदर्श शेतकरी सन्मान प्राप्त शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

गेली सोळा वर्ष अविरतपणे रायगड जिल्ह्यात रायगड प्रेस क्लबच्यावतीने तसेच रोहा प्रेस क्लबच्या माध्यमातून येथील कृतिशील आणि प्रयोशिल प्रगत शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात येत आहे. सन्मान सोहळ्याला रोहा तालुका कृषी अधिकारी महादेव करे, मराठी पत्रकार परिषदेचे कोषाध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, प्रिया कांबळे, रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष सुहास खरीवले, कृषी अधिकारी प्रकाश राक्षीकर, पत्रकार राजेंद्र जाधव, ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर ,कृषी अधिकारी महादेव करे,रोहा प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी उत्तम मार्गदर्शन केले. शेतकरी रतीश मगर, केशव खरीवले यांनी शेतीबाबत तसेच विविध पिके, शेतीपूरक व्यवसाय मिळणाऱ्या उत्पन्नाची माहिती दिली. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा, शेती प्रयोगाचे फायदे बदलत्या काळात युवा पिढीला प्रेरणादायी ठरेल, अशी सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदकुमार मरवडे यांनी केले. सुहास खरीवले, नरेश कुशवाह, श्याम लोखंडे, शरद जाधव, जितेंद्र जाधव, संदीप सरफळे, महेश बामुगडे, अंजुम शेटे, समिधा अष्टीवकर, नंदकुमार बामुगडे यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

# महामार्गावर गर्डर बसवण्यासाठी पुन्हा वाहतूक बंदी

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील मुंबई गोवा वाहिनीवर मे. कल्याण टोल इन्फा.प्रा.लि.कंपनीतर्फे कोलाड पुई येथील म्हैसदरा नवीन पुलावर गर्डर बसविण्याचे काम पुन्हा एकदा करण्यात येणार आहे. गुरुवार १८ जुलै २०२४ ते शुक्रवार १९ जुलै २०२४ पर्यंत दुपारी १२ ते दुपारी ४ या दरम्यान सलग चार तास वाहतूकीसाठी बंद करण्यात येणार असल्याची माहिती पोलिस अधिक्षक (मुख्यालय) अरविंद साळवे यांनी दिली.

मे कल्याण टोल इन्फा.प्रा. लिमिटेड कंपनीतर्फे करण्यात येणाऱ्या नियोजित कामाच्यावेळी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर सर्व प्रकारची (हलकी व जड अवघड वाहने) यांची वाहतूक बंद करण्यात येणार आहे. दरम्यान, या महामार्गावर वाहतूककोंडी होऊ नये वाहन चालकांची गैरसोय तथा वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतूक बंद करून जनतेला वाहतूकीसाठी पर्यायी मार्ग वापरण्याबाबत अधिसूचना जारी करीत आहोत, असे साळवे यांनी सांगितले. वाहतूक मुंबई-गोवा महामार्ग ६६ वरून मुंबई ते गोवा वाहिनीवर (मुंबईकडून गोव्याकडे ) जाणारी हलकी वाहने व बसेस या वाकण फाटा येथून भिसे खिंड रोहा कोलाडवरून जाईल, तर खोपोली पाली वाकण राष्ट्रीय महामार्ग ६६ वरून पालीमार्गी रवाळजे, निजामपूर, माणगाव या पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार असल्याची माहिती कोलाडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मोहिते यांनी दिली आहे.



# शर्वरी बैकर शिष्यवृत्ती परीक्षेत द्वितीय

**तळा** : शहरातील रायगड जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत शिकणाऱ्या शर्वरी सुनील बैकर हिने शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण होऊन तालुक्यात द्वितीय येण्याचा बहुमान मिळवला आहे.शांत, संयमी व अभ्यासात हुशार असलेल्या शर्वरी बैकर हिने आपले वडील शिक्षक सुनील बैकर व शिक्षक रत्नाकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होऊन तालुक्यात द्वितीय तर जिल्ह्यात दहावा क्रमांक पटकावला आहे. शर्वरीने मिळविलेल्या या उज्वल यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, सर्व शिक्षकांसह विविध मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# पाण्याच्या पाईपलाईनमध्ये मृत साप

**। नेरळ। वार्ताहर ।**

गावातील स्टेशन आळीमधील गंगुबाई चाळीमध्ये येणाऱ्या जलवाहिनीमध्ये साप आढळून आला. नळाला पाणी येत नसल्याने स्थानिकांनी ग्रामपंचायत कर्मचारी यांना बोलावून पाण्याचे लिकेज शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यानंतर देखील पाणी कुठे गायब होते. याचा शोध लागत नव्हता. शेवटी मुख्य जलवाहिनी खोलून बघितली असता त्यात तीन फूट लांबीचा मृत साप आढळून आला आहे. दरम्यान, नेरळ ग्रामपंचायतीच्या या कारभाराबद्दल नेरळ ग्रामस्थ संताप व्यक्त करीत आहेत.

नेरळ रेल्वे स्टेशन हद्दीत असलेल्या गंगुबाई चाळ भागातील रहिवाशी यांना तीन दिवस पाणी येत नव्हते. त्यामुळे स्थानिक रहिवाशी यांनी पाणी येत नसल्याने नेरळ ग्रामपंचायतीकडे तक्रार केली. प्रभाग दोनमधील विद्यमान सदस्य शारदा साळेकर देखील याच परिसरात राहतात. पाण्याच्या वाहिनीला कुठे लिकेज असतील आणि त्यामुळे पाणी येत नसेल असे सर्व रहिवाशी यांना वाटले होते. मात्र पाईप लाईन कोठे लिकेज आहे का, याची चाचपणी केली असता कुठेही पाईपलाईन फुटली नव्हती.

शेवटी गंगुबाई चाळीकडे येणारी जलवाहिनी उघडून बघण्याचा निर्णय ग्रामपंचायत कर्मचारी यांनी घेतला. त्यावेळी स्थानिक रहिवाशी पाईपलाईन खोलून झाल्यावर अक्षरश हैराण झाले. साधारण तीन ते साडे तीन फूट लांबीचा मृत साप त्यावेळी त्या जलवाहिनी मधून बाहेर काढण्यात आला.



# उरणचा आमदार आघाडीचाच असेल-नरेश घरत

**। उरण । वार्ताहर ।**

आगामी विधानसभा निवडणुकीत उरण मतदारसंघाचा आमदार हा महाविकास आघाडीचाच असेल, असे प्रतिपादन शेकापचे माजी सभापती नरेश घरत यांनी केले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत उरण विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांना उरण विधानसभा मतदारसंघातून १३ हजार पेक्षा जास्त आघाडी मिळवून दिली आहे. त्यामुळे इंडिया आघाडीसाठी अतिशय चांगले वातावरण असल्याचे ते म्हणाले.

### ■ उरणमध्ये चांगले दिवस

विधानपरिषद निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांचा पराभव झाल्याने शेकापमध्ये नाराजीचा सूर होता. मात्र दुसऱ्याच दिवशी जयंत पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन पक्षाची पुढील दिशा ठरवली आहे.

त्यात शेकाप इंडिया आघाडीचाच भाग असून विधानसभा निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष हा काँग्रेस, शिवसेना(उबाठा), राष्ट्रवादी (शरद पवार) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, आप, सपा व इतर मित्र पक्षांसोबत निवडणूक लढवणार असल्याचे सांगितले.

# खांब येथे पॉवर टिलरद्वारे चिखलणीचे प्रात्यक्षिक

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील खांब येथे पॉवर टिलरद्वारे चिखलणीचे प्रात्यक्षिक प्रयोग यशस्वीपणे दाखविण्यात आला आहे. कृषी महाविद्यालय, दापोलीच्या चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांच्या ग्रामीण जागृती कार्यानुभव कार्यक्रमच्या कृषी संजीवनी गटाने (कृषीदूत) खांब या गावात पॉवर टिलरद्वारे चिखलणीचे प्रात्यक्षिक करून दाखवले. सोबतच भातशेतीमध्ये हिरवळीच्या खतांच्या वापरासंबंधी प्रात्यक्षिक दाखविले. गिरीपुष्पाच्या पानांचा हिरवळीचे खत म्हणून वापर केल्यास उत्पन्नात भरघोस वाढ होत असल्याचे मार्गदर्शनही यावेळी शेतकरी वर्गाला केले. तर ग्रामीण भागात गिरीपुष्प, चवळी, मूग, बर्सीम (चारा पीक), ताग, ढैंचा, आदी वनस्पती सहज उपलब्ध होतात. या हिरवळीचे खत म्हणून वापर केल्यास पीकाला नत्र, स्फुरद, पालाश तसेच इतर अन्नद्रव्यांचा पुरवठा होतो. 'गिरीपुष्प' या वनस्पतीचा वापर करून उत्पन्न वाढीसंबंधीचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना दाखविण्यात आले. परिसरातील शेतकरी उपस्थित होते.



## कोलाड हायस्कूलकडे जाणाऱ्या
# रस्त्याची दयनीय अवस्था

### विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या जीवाला धोका

**। कोलाड । वृत्तसंस्था ।**

मुंबई-गोवा मार्गावरून कोलाड हायस्कूलकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली असुन या रस्त्याने जाणारे विद्यार्थी, पालक तसेच कामगार, जेष्ठ नागरिक यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

या रस्त्यावर प्राथमिक मराठी शाळा, कै.द.ग.तटकरे माध्यमिक व ज्युनिअर कॉलेज, तसेच आजूबाजूला असणारी वस्ती असुन याचमार्गानी धाटाव औद्योगिकक्षेत्रात काम करणारे असंख्य गावातील कामगार, विद्यार्थी व रहिवाशी नागरिक या मार्गाने प्रवास करीत असतात. परंतु रस्त्याला पडलेले जागोजागी खड्डे नागरिकांच्या जीवावर उठत आहेत. जोरदार पाऊस पडला तर या खड्ड्यात पाणी साचते. या साचलेल्या पाण्यामुळे रस्त्यात असणारा खड्डा दिसत नाही. त्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हा रस्ता टाटा पॉवर मालकीचा असुन येथून रेल्वे लाईन सुरु होती. नंतर हा रस्ता बनविण्यात आला. या मार्गावर सातत्याने खोदकाम केले जात असल्याने रस्ता खराब झाला आहे. हे फक्त जणू ठेक्यासाठी चालले आहे. का असा सवाल उपस्थित केला जात आहे.



दरम्यान, खराब रस्त्यामुळे एखादा मोठा अपघात झाला तर याला जबाबदार कोण? अपघात घडण्याच्या अगोदर या रस्त्याचे काम लवकरच लवकर केले जावे अशी मागणी केली जात आहे.

# धगडवाडी भट फार्म येथे वनमहोत्सव उत्साहात साजरा

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील धगडवाडी (भट फार्म) येथे माँ प्रतिष्ठानच्यावतीने वनमहोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृष्णा भट, सिद्धार्थ भट, प्रतिष्ठानचे पदाधिकारी तसेच वन अधिकारी, कर्मचारी व विभागातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. गेली कित्येक वर्षे गोशाळा परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने याही वर्षी हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात व उत्साहात साजरा करण्यात आला असल्याची माहिती प्रतिष्ठानच्यावतीने देण्यात आली.

दिवसेंदिवस पृथ्वीचे वाढत चाललेले तापमान व ग्लोबल वॉर्मिंगचे परिणाम पाहता वृक्षारोपण करणे काळाची गरज आहे. तर निसर्गाला आपण वाचविले तर निसर्ग आपल्याला वाचवेल असे कृष्णा भट यांनी सांगितले. त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



# दुचाकीची चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरातील तक्का परिसरातून एक मोटारसायकल चोरीस गेल्याची घटना घडली आहे. कमलाकर साळुंखे यांनी त्यांची दहा हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची मोटारसायकल क्र. एमएच-४६-टी-५५७४ ही ब्ल्यू स्टार गॅरेज शॉप नं.२, चॅनल एलीजेन्स तक्का येथे उभी करून ठेवली होती. दुसऱ्या दिवशी त्यांना ती जागेवर दिसली नाही. आजूबाजूला त्यांनी चौकशी करुनही दुचाकी सापडली नाही. त्यानंतर त्यांनी याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब खालापूरच्या माध्यमातून अनेक उपपक्रम राबवित असताना, जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून वडवळ येथील माध्यमिक शाळेतील आठवी ते दहावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना वह्या, पेन, छत्री, प्राथमिक उपचार किट व खाऊचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम प्रोजेक्ट चेअरमन जितेंद्र सकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा राबविण्यात आला. यावेळी लायन्स क्लब प्रोजेक्ट चेअरमन जितेंद्र सकपाळ, अध्यक्ष शिवानी जंगम, उपाध्यक्ष लहू भोईर, भरत पाटील, किशोर पाटील, अशोक पाटील, हरिभाऊ जाधव, कांचन जाधव, महेंद्र सावंत, तानाजी चव्हाण, रणजित ग्रोव्हर तसेच सरपंच, उप सरपंच, सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

### नागरिकांसह वाहन चालकांना होतोय त्रास
# एकदरा पुलावर मोकाट गुरांचा ठिय्या

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

मुरूड शहराजवळील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत वर्दळीच्या एकदरा पुलावर रोज मोकाट उनाड गुरे उभी राहत असल्याने वाहनांना वाट काढताना मोठी कसरत करावी लागत असून सातत्याने कोंडी होत आहे. विशेष करून सायंकाळी ही गुरे पुलावर घोळक्याने येऊन ठिय्या ठोकून बसत असल्याने अनेक वाहनचालक आणि पादचाऱ्याना त्रास होत आहे. शासकीय यंत्रणेने यावर कोणतीही उपाययोजना केलेली नसल्याचे येथील नागरीक सांगत आहेत.

एकदरा पुलावर रात्री दिवाबत्तीची सोय नसल्याने अंधार पसरलेला असतो. रात्रीच्या वेळी पायी चालणाऱ्या पादचाऱ्यांना बसलेल्या गुरांचा धक्का लागून अपघात होत असतात. या गुरांना कितीही हाकलले तरी ते जात नाहीत. पूर्वी अशा मोकाट गुरांना नगरपरिषदेकडून पकडून कोंडवाड्यात टाकले जात असे. आता कोंडवाडे नाहीत आणि उपाययोजना करणारी यंत्रणा देखील नसल्याने रोज मरे त्याला कोण रडे, अशी अवस्था झाली आहे. जेव्हा या मोकाट गुरांची झुंज लागते तेव्हा पादचारी जखमी व वाहनांचे देखील नुकसान होत असते. असे प्रकार यापूर्वी अनेकदा झाल्याची माहिती येथील नागरिकांनी दिली आहे.



**निवडक**

## पार्किंगमधून रिक्षाची चोरी

**पनवेल :** गुल्फाम सगीर अहमद हैदर यांनी संदीप पाटील यांची रिक्षा (एमएच-४६-एसी-३५७०) शिफ्टनुसार चालवण्यास घेतली. त्यांनी रिक्षा इमारतीच्या पार्किंगमध्ये पार्क करून ठेवली व ते घरी गेले. दुसऱ्या दिवशी इमारतीच्या पार्किंगमध्ये आले असता रिक्षा मिळून आली नाही. त्यांनी तळोजा, धरणा कॅम्प, रोहिंजण, मुंब्रा व कळवा परिसरात रिक्षाचा शोध घेतला असता सापडून आली नाही. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

## आपटा येथे वृक्षारोपण

**आपटा :** आपटा गावातील जुना कोळीवाडा येथील गणपती मंदिर व तेथील मोकळ्या जागेत आपटा कोळी समाजातील बांधवांनी वृक्षारोपण केले. यावेळी वेगवेगळ्या प्रकारच्या ३० रोपांची लागवड करण्यात आली. या वृक्षारोपणाला दत्ता पाटील, ज्ञानेश्वर भोईर, मयुर शेलार, रोशन भोईर, महेंद्र भोईर, प्रदीप भोईर, दर्शन भोईर, राजा देशमुख, बालु पेढारी, बी.एस.कुलकर्णी तसेच कोळी बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लाखोंचा ऐवज लंपास

**पनवेल :** तळोजा येथील पेंधर गावातील सचिन कसबे कुटुंबासह पहाटेच्या सुमारास गाढ झोपेत असताना अज्ञात चोरट्यांनी किचनचे ग्रील उचकटून त्यांच्या घरात प्रवेश केला. त्यानंतर या चोरट्यांनी कसबे यांच्या घरातील दागिने आणि रोख रक्कम असा तब्बल ६ लाख ९० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला. पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास कसबे यांना जाग आल्यानंतर त्यांना घरामध्ये चोरी झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी तळोजा पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली आहे.

## डिलेव्हरी बॉयने चोरला मोबाईल

**पनवेल :** डिलेव्हरी बॉय बनून आलेल्या एका चोरट्याने खारघर वसाहतीमधील इमारतीच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या सुरक्षा रक्षकाचा मोबाईल चोरुन नेल्याची घटना घडली आहे. येथील कृष्णा मॅजेस्टी सोसायटीच्या लिफ्टसमोर सुरक्षा रक्षक बसला होता. दरम्यान, सुरक्षा रक्षक बाजूला कामासाठी गेला असताना तेथे आलेल्या डिलेव्हरी बॉयने सुरक्षा टेबलावर ठेवलेला मोबाईल चोरुन नेला. ही सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चित्रीत झाली आहे. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## शालेय साहित्य वाटप

**पनवेल :** डिस्ट्रिक्ट चाइल्ड एज्युकेशन सपोर्ट कूटिचे राजेशकुमार, लायन्स क्लब पनवेल सरगम आणि न्यू पनवेल स्टील टाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने ८० गरजु विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन प्रांतपाल एन.आर. परमेश्वरन तर विशेष अतिथी म्हणुन विजय गणात्रा हे उपस्थित होते. यावेळी सुयोग पेंडसे, रमाकांत म्हात्रे, वाय.पी. सिंग, घनश्याम आहुजा, मानदा पंडित, प्रेमेंद्र बहिरा, स्वाती गोडसे, निशिकांत म्हात्रे, रवींद्र लोखंडे, जगसियानी बक्षी आदि उपस्थित होते.

# वावे-बेलोशी रस्त्याची दुरवस्था

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**तालुक्यातील वावे-बेलोशी रस्त्यावर ठिकठिकाणी मोठंमोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यातून वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसह डांबरीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने गेल्या दोन वर्षात लाखो रुपयांचा निधी खर्च केला. बांधकाम विभागाच्या दुर्लक्षपणामुळे यंदाही पावसाळ्यात प्रवाशांना खड्ड्यातून प्रवास करण्याची वेळ येत आहे.**

### लाखो रुपये खर्चूनही खड्ड्यातून प्रवास



अलिबागपासून पंधरा किलोमीटर अंतरावर वावे गाव आहे. या वावेपासून दोन किमी अंतरावर बेलोशी गांव आहे. वावे ते बेलोशी या रस्त्यासाठी अर्थ संकल्पातून लाखो रुपयांचा निधी खर्च करण्यात आला होता. रुंदीकरणाबरोबरच खड्डे बूजविणे, कारपेट टाकणे, डांबरीकरण करणे अशा अनेक प्रकारची कामे होती. मात्र, हे काम अपूर्ण राहिल्याचे चित्र आजही दिसून येत आहे. या रस्त्यासाठी लाखो रुपये खर्च करूनही पावसाळ्यात हा रस्ता खराब होत आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. वाहन चालविण्याबरोबरच पादचाऱ्यांनादेखील या खड्ड्यातून प्रवास करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तसेच, खड्डयांमुळे रस्त्याला तलावाचे स्वरूप आले आहे. दगड, खडी रस्त्यावर आली आहे. या खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करताना अपघाताची भिती निर्माण झाली आहे. या रस्त्यासाठी पुन्हा अर्थसंकल्पातून निधी मंजूर झाल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उपलब्ध झाली आहे. मात्र, निवडणूक व अन्य कारणे दाखवून या रस्त्याचे काम करण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने टाळाटाळ केल्याचा आरोप प्रवासी वर्गाकडून केला जात आहे. वावे ते बेलोशी पर्यंतचा रस्ता खराब झाल्याने प्रवासी वर्गाकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

### उपअभियंत्याचा खोटारडेपणा

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता राजू डोंगरे यांच्याशी संपर्क साधला असता, या रस्त्याची डागडूजी पावसाळ्या पुर्वी करण्यात आली आहे. सध्या पाऊस आहे, पाऊस थांबल्यावर खड्डे बूजविण्याचे काम पुन्हा केले जाईल, असे सांगण्यात आले आहे. यातून या अधिकाऱ्यांचा खोटारडेपणा दिसून येत आहे. उन्हाळ्यातदेखील या रस्त्यावर खड्डे होते. त्याची दुरुस्ती झाली नाही. ज्यावेळी पहिला पाऊस पडला. त्यावेळी वावे येथील रिक्षा चालक मालक यांनी सामाजिक बांधिलकी जपत रस्त्यावर साचलेले पाणी बाहेर काढले. रस्त्यावर पडलेले खड्डे श्रमदातून बूजविण्याचे काम केले.**

### राजू डोंगरेवर वरिष्ठांकडून कारवाई

**अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याचे काम संथगतीने सुरु आहे. त्याचा नाहक त्रास प्रवाशांना होत आहे. या कामाची गती दिसून येत नसल्याने वरिष्ठांनीदेखील उपअभियंता यांच्या कामाबाबत नाराजी व्यक्त केली. त्यामुळे त्यांच्याविरोधात नोटीस बजावून कारवाईची मोहिम हाती घेतल्याची माहिती खात्रीशीर सुत्रांकडून उपलब्ध होत आहे.**

> **पाऊस मोठ्या प्रमाणात आहे. वावे - बेलोशी रस्त्यावरील खड्डे बूजविण्याचे काम लवकरच केले जातील.**
>
> **- राजू डोंगरे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग**

# मोकाट गुरांच्या शिंगांना रेडियम

**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहरातील रस्त्यांवर बसणाऱ्या मोकाट गुरांमुळे अपघातांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. याबाबतच्या बातम्या प्रसारमाध्यमांमधून झळकल्यानंतर खडबडून जागे झालेल्या तळा नगरपंचायत प्रशासनाने आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत मोकाट गुरांच्या शिंगांना रेडियम चिटकवले. ज्यामुळे रात्रीच्यावेळी या रेडीममुळे होणारा अपघात टाळण्यास मदत होणार आहे.



तळा शहरातील रस्त्यांवर रात्रीच्या वेळी अनेक भागात उनाड गुरांचे बसण्याचे प्रमाण अधिक असल्याने रात्रीच्यावेळी वाहन चालक अथवा प्रवासी रस्त्यावरुन जात असताना अपघात होण्याचा धोका अधिक आहे. तसेच, काहीवेळा दुचाकीस्वार पडल्याच्या घटनाही घडल्या आहेत. या घटना घडू नयेत यासाठी उनाड गुरांच्या शिंगांनानगरपंचायतीच्यामाध्यमातून रेडीयमच्या पट्ट्या चिकटविण्यात येत आहेत. अशा पट्ट्या अनेक गुरांच्या शिंगांना चिकटवल्याने रात्रीच्यावेळी दुचाकीस्वाराला व चारचाकी वाहन चालकाला या गुरांच्या शिंगांना चिकटवलेल्या पट्ट्या चमकताना दिसतात व त्यावेळी वाहनचालकांच्या लक्षात येते की येथे काहीतरी आहे. त्यामुळे ते लगेच सावध होतात.

# पावसाळी भूछत्र्यांची न्यारी दुनिया

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

पावसाळा सुरू झाला की रानमाळावर, शेताच्या बांधावर, घराच्या पागोळी बाहेर लहान मोठ्या आकाराच्या छत्र्या म्हणजेच छत्र उगवलेले कवक हमखास दिसतात. त्यांना कुत्र्याची छत्री, आलंबे, अळंबी, अलिंब अशा विविध नावाने ओळखले जाते. दिसायला आकर्षक व छत्रीच्या आकारासारखी पांढरे शुभ्र, काळसर असणारी, जाळीदार छत्री सारखी गदेच्या आकाराचे तर काही काड्यासारखी जाळीदार असतात.



यापैकी काही भूछत्रे खाण्यासाठी योग्य, काही औषधी तर बहुतांश विषारी असतात. यांचा व्यास साधारणपणे आठ सेंटीमीटर पेक्षा जास्त नसतो. भूछत्रांच्या जगात २००० जाती असून त्यातील फारच थोड्या जातींची घरगुती अथवा व्यापारी प्रमाणावर लागवड होते. भूछत्र ही कवक असून कवकांच्या वरच्या स्तरातील कोणत्याही खाद्य अथवा अखाद्य मांसल कवकाला भूछत्र असे म्हणतात.

कोकणात साधारणता आषाढ महिन्याच्या पहिल्या पंधरा दिवसानंतर पडणाऱ्या पावसात माळरानावर येणाऱ्या भूछत्रांचा खाण्यासाठी उपयोग केला जातो. आळंबी म्हणून ही भूछत्रे प्रसिद्ध आहेत. ग्रामीण, शहरी भागात या भूछत्रांना चांगली मागणी असून शंभर ते दोनशे रुपये वाट्याने ती विकली जातात.

## रा.ग.पोटफोडे यांचे निधन

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील शिरवली येथील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा रा.जि.प.चे माजी उपाध्यक्ष रा.ग.पोटफोडे यांचे मंगळवारी (दि.१६) वयाच्या



९८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सहा मुली, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी गुरूवार दि.२५ ऑगस्ट रोजी तर अंतिम धार्मिकविधी रविवार दि.२८ ऑगस्ट रोजी शिरवली येथील निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

# जेथे असते एकी तेथे असते नेकी

### प्रसाद पांढरे यांचे प्रतिपादन

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण सराफ सुर्वणकार असोसिएशन मार्फत पेण जैन हॉल येथे कौटुंबिक वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रपती पुरस्कार विजेते वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक प्रसाद पांढरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.



यावेळी बोलताना पांढरे म्हणाले की, आज समाजाला एकत्र येण्याची गरज आहे. कारण परस्परांबद्दल आपलेपणा जपल्याने समाज बलाढ्य होत असतो आणि आज व्यवसायिकदृष्ट्या पाहिल्यास सराफ असोसिएशनची एकी हीच त्याची ताकद आहे. जे आनंदी जिवन जगतात ती नेक माणसं असतात. कुटुंबा समवेत एक दिवस का होईना धंद्याचा ताणतणाव दुर ठेवून परस्परात आनंद वाटला जातो. आज सर्व रोगांवर एकच रामबाण उपाय आहे तो म्हणजे आनंद. आणि ही असोसिएशन आनंदाची देवाण-घेवाण करत आहेत.

यावेळी पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी सांगितले की, पेणमध्ये आल्यानंतर पहिल्यांदाच मला एका कौटुंबिक कार्यक्रमाला बोलवून सुवर्णकार असोसिएशन ने त्यांच्या कुटुंबाचा सदस्य केला आहे. भविष्यात या कुटुंबावर कोणतेच संकट येणार नाही यासाठी मी सदैव प्रयत्नशिल असेल. ॲड. महेश देसले यांनी कायदेविषयी मार्गदर्शन केले. तर, संतोष पाटील यांनी सुवर्णकारांना आनंद विकणारी गोड माणसं असा उल्लेख केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष हरीओम म्हात्रे यांनी केले.

# होर्डिंग लावणाऱ्यांवर कारवाईची मागणी



**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल महानगरपालिका समोर जाहिरातींचे होर्डिंग लावणाऱ्या जाहिरात फलक कंपनी (रोशन ॲडव्हरटायझिंग) यांच्यावर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षातर्फे आंदोलन छेडून करण्यात आली.

या आंदोलनात युवक प्रदेशाध्यक्ष महबूब भाई शेख यांच्या सूचनेनुसार व जिल्हाध्यक्ष सतीश पाटील, सूरदास गोवारी, फारुख पटेल, उत्तमराव गायकवाड, मोद बागल, राजश्री कदम, रेणुका पगारे, मुनीर तांबोळी, सनी फडके, संतोष शेट्टी, दीपिका भांडारकर, मनोज भगत, प्रशांत जाधव या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आले. यावेळी जिल्ह्याचे सर्व ज्येष्ठ नेते, पदाधिकारी, महिला, युवक कार्यकर्ते आदी बहूसंख्येने उपस्थित होते.

# रुग्णालयाच्या इमारतीला झुडपांचा विळखा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागेतील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या प्रशासकिय इमारतीला झुडपांनी विळखा घातला आहे. हे झुडूप काढण्यास प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने इमारतीच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे.

अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या बाजूलाच प्रशासकिय इमारत आहे. या इमारतीच्या तळ मजल्यावर बाह्य रुग्ण कक्ष असून या विभागामार्फत वेगवेगळ्या रुग्णांची तपासणी करून त्यांना मार्गदर्शन केले जाते. पहिल्या मजल्यावर जिल्हा शल्यचिकित्सक यांचे कार्यालय आहे. बाजूलाच कर्मचाऱ्यांचे कार्यालय आहे. दुसऱ्या मजल्यावर शासकिय वैद्यकिय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांचे कार्यालय आहे. या इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात रुग्णांसह त्यांचे नातेवाईक, वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी, परिचारिका यांची सतत वर्दळ असते.



तसेच, रुग्णालयात स्वच्छता राहवी यासाठी शल्यचिकित्सक यांनी प्रयत्न केले. रुग्णालयातच्या आवारात येणाऱ्या वाहनांमुळे गर्दी होऊ नये यासाठी वाहन पार्कींग व्यवस्था करण्यात आली. मात्र, रुग्णालयाच्या या इमारतीला झुडपांनी विळखा घातल्याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. पहिल्या मजल्यापासून वरच्या मजल्यापर्यंत ठिकठिकाणी लहान मोठी झुडपे या इमारतीवर उगवली आहेत. ही झुडपे काढण्यास प्रशासन उदासीन ठरल्याने ती झपाट्याने वाढू लागली आहेत. याकडे जिल्हा शल्यचिकित्सक लक्ष देतील का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# प्रियकराचा प्रेयसीवर अत्याचार

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल भागात राहणाऱ्या एका तरुणाने आपल्या प्रेयसीवर मागील वर्षभरापासून लैंगिक अत्याचार करुन तिचे आश्लिल फोटो आणि व्हिडीओ व्हायरल केल्याची घटना उघडकीस आली आहे. खांदेश्वर पोलिसांनी या तरुणाविरोधात बलात्कारासह धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या घटनेतील २३ वर्षीय पिडीत तरुणी आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा तिचा २३ वर्षीय प्रियकर दोघेही पनवेल भागात राहण्यास असून दोघेही एकमेकांचे दुरचे नातेवाईक आहेत. दोघेही एकाच परिसरात राहण्यास असल्याने त्यांच्यामध्ये मागील वर्षभरापासून प्रेमसंबंध सुरु झाले होते. यादरम्यान, आरोपी तरुणाने पिडीत तरुणीला विमलवाडी येथे भाड्याने घेतलेल्या आपल्या घरामध्ये नेऊन तिच्यावर अनेकवेळा जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले. मागील २-३ महिन्यांपर्यंत या दोघांमध्ये प्रेमसंबंध सुरु होते. यादरम्यान, या तरुणाने पिडीत तरुणीचे आपल्या मोबाईलवरुन व्हिडीओ आणि फोटो काढले. गेल्या महिन्यामध्ये या तरुणीने आरोपीसोबत शररीसंबंध करण्यास नकार दिला असता, त्याने तिला शिवीगाळ करुन मारहाण केली. तसेच, तिचे आश्लिल फोटो आणि व्हिडीओ तिच्या वडीलांना दाखविण्याची धमकी दिली. त्यानंतर त्याने पिडीत तरुणीचे आश्लिल फोटो आणि व्हिडीओ व्हायरल केले. या प्रकारानंतर पिडीत तरुणीने खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- Tally अकाऊंट कामाचा अनुभव असलेली लेडीज हवी आहे. ८००७८३३२३२ झिराड, पगार १८०००/२१०००
- वाडगाव फाटा येथे कॉटेजमध्ये काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. मो.९७६२७७७९७५
- शॉप भाडेने देणे आहे. आत २००sq.ft. आणि बाहेर २०० sq.ft.R.C.F. कॉलनी समोर, साळवी ऑटोचे शेजारी, भाडे -१०,०००/- ८२०८३७२०३०, ७७५८००३४५६
- Graduate candidates required for office in Alibag Call 9422383099 For interview between 11 am to 6 pm

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### रायगड जिल्हा परिषदेचा अनोखा उपक्रम

# दिव्यांगांना रोजगाराचे साधन उपलब्ध

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**जिल्ह्यातील दिव्यांगाना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, त्यांच्यामध्ये व्यावसायिक दृष्टीकोन निर्माण व्हावा, यासाठी रायगड जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला आहे. जिल्हा परिषदेमार्फत दिव्यांग बांधव, मागासवर्गीय बचतगट, महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी १५६ ई-शॉप वाहन दिले जाणार आहे. १५ लाभार्थ्यांना ई-शॉप देण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांना रोजगाराचे साधन खुले झाले आहे.**



रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून दिव्यांग बांधव, मागासवर्गीय बचतगट, महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना, उपक्रम राबविण्यात येतात. याचाच एक भाग म्हणून दिव्यांग बांधव, मागासवर्गीय बचतगट, महिला बचतगटांना रोजगार करता यावा यासाठी ई-शॉप वाहन ही योजना हाती घेण्यात आली आहे. ही योजना जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण तसेच महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. योजनेअंतर्गत दिव्यांग बांधव ७१, मागासवर्गीय बचतगट २८, महिला बचतगट ५७ लाभार्थ्यांना ई-शॉप वाहने दिली जाणार आहेत.

पर्यावरणस्नेही ई-शॉप वाहन सुमारे ३ लाख ५० हजार रुपये किंमतीची आहेत. वाहनातील अंतर्गत भागात व्यवसायाच्या दृष्टीने डिझाइन करण्यात आले आहे. फिरत्या वाहनावरील दुकानामुळे दिव्यांग बांधव, बचतगटांना रोजगार प्राप्त होणार आहे.

> **सर्व विभागांचा ५ टक्के दिव्यांगांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार या निधीतून दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना व्यवसाय करता यावा यासाठी ई-शॉप वाहन देण्याचे निश्चित केले. याचबरोबर महिला बचतगटांच्या सक्षमीकरणासाठी ई-शॉप वाहन देण्यात येत आहे. ही योजना यापुढेही सुरू ठेवण्यात येणार आहे.**
>
> **- डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड**

# पारगाव हिलवर अर्ली व्हॉर्निंग डिटेंशन सिस्टम



। पनवेल । प्रतिनिधी ।

नजीकच्या काळात अतिवृष्टीमुळे भूस्खलनाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. यामुळे वित्तहानी तर होतेच अनेक निष्पापांना आपले जीव गमवावे लागत आहे. नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ परिसरात पुष्पकनोडला लागुन असलेल्या पारगाव हिलवर सिडकोच्या वतीने अर्ली व्हॉर्निंग डिटेंशन सिस्टम बसविण्यात येत आहे. या यंत्रणेमुळे या परिसरतील डोंगरावर काही हालचाली झाल्यास अथवा भूस्खलन होणार असल्यास त्याची माहीती या यंत्रणेद्वारे अगोदरच समजणार आहे.

५०० मीटरच्या जागेत उभारल्या जाणाऱ्या जागेत यंत्रणेत लोखंडी जाळी देखील लावण्यात येणार आहे. २३ करोड खर्चून उभारल्या जाणारा प्रकल्प पुणे स्थित टेक्निकल हायबर्स या कंपनीमार्फत सिडको उभारत आहेत. पुष्पक नोडमध्ये नवी मुंबई परिसरातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. याठिकाणी प्रकल्पग्रस्तांना भूखंड देखील देऊ करण्यात आले आहेत. भविष्यात याठिकाणची लोकवस्ती झपाट्याने वाढणार असल्याने सिडको प्रशासनामार्फत सावधानता बाळगण्यासाठी हि यंत्रणा बसविण्यात येत आहे. या परीसरात यापूर्वी अनेक वेळा भूस्खलन झाले आहे त्यात जीवितहानी झाली नसली तरी भविष्यातयाबाबत उपाययोजना राबविणे काळाची गरज असल्याने सिडकोने हा निर्णय घेतला आहे.

पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात सह्याद्री पर्वतरांगाचे जाळे पसरले आहे. पनवेल ग्रामीण, खारघर हिल, पुष्पकनोड आदीठिकाणी या पर्वत रांगा पसरलेल्या आहेत. दरवर्षी पनवेमध्ये कुठेना कुठे? भूस्खलनाचे प्रकार घडत असतात. सिडकोने बसविलेली ही यंत्रणा यशस्वी ठरल्यास इतर ठिकाणी ही यंत्रणा बसवून भूस्खलद्वारे होणाऱ्या दुर्दैवी घटना टाळण्यास मदत होणार आहे.

## अशी मिळणार माहिती

या यंत्रणेद्वारे डोंगरातील लहान लहान हालचालींची माहिती त्वरित एसएमएसद्वारे मिळणार आहे. या सिस्टममध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी,नोडल अधिकारी अथवा इतर वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित कंपनीच्या प्रतिनिधीला माहिती मिळणार आहे.पूर्वकल्पना मिळणार असल्याने या परिसरात त्वरित उपाययोजना राबवून पुढील वित्तहानी आणि जीवितहानी टळणार आहे.

> “ अर्ली व्हॉर्निंग डीटेंशन सिस्टमद्वारे पारगाव हिल परिसरात भूस्खलन होणार असल्यास त्याची आगाऊ माहिती मिळणार आहे.पुढील मोठी घटना टाळण्यासाठी या यंत्रणेचा उपयोग होणार असुन ५०० मीटर जागेत हि व्हॉल उभारण्याचे काम सुरु आहे.
>
> – चैतन्य घरत (सहाय्यक कार्यकारी अभियंता, एअरपोर्ट –२ सिडको ) ”

# कापडे बुद्रुक येथे प्रथमच हळद लागवड

## ■ रामदास सकपाळ यांचा अभिनव उपक्रम



। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील कापडे बुद्रुक येथील उद्योजक व प्रगतशील शेतकरी रामदास सीताराम सकपाळ यांनी आपल्या शेतातील अर्धा एकर जमिनीमध्ये हळदीच्या सेलम जातीचा लागवड केली आहे. यापूर्वी रामदास सकपाळ यांनी सागाच्या शेकडो रोपांची लागवड करून तालुक्यातील शेतकऱ्यांपुढे आदर्श निर्माण केला आहे.

रामदास सकपाळ यांनी हळद लागवडीसाठी सातारा जिल्ह्यातील वाई येथून ६०० किलो बियाणे खरेदी केले व त्यांच्या वाडीतील काही शेतकऱ्यांना त्यांनी प्रायोगिक तत्त्वावर बियाणे वाटप केले व त्यांना हळद लागवडीविषयी माहिती दिली. हळदीमध्ये तणाचे नियंत्रण करण्यासाठी गोल या तणनाशकाचा वापर करून तणाचा बंदोबस्त केल्याचे यावेळी रामदास सकपाळ यांनी सांगितले. त्यांनी पुढील वर्षी हळद लागवडीखालील क्षेत्र वाढविण्याचा मनोदय असल्याचे सांगितले.

याप्रसंगी कृषी सहाय्यक कोमल कचरे यांनी कापडे बुद्रुक गावामध्ये हळद पावडर तयार करण्यासंदर्भात प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग या योजनेमधून लाभ घेण्याविषयी मार्गदर्शन केले. यावर्षी सोयाबीन पिकाची लागवड प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आली असून या पिकाचे खत व्यवस्थापन व तण नियंत्रण यासंदर्भातही कृषी सहाय्यक कचरे यांनी माहिती दिली.

# कोकणवासीय समाज संस्था अध्यक्षपदी सुतार



। माथेरान । वार्ताहर ।

माथेरान कोकणवासीय समाज संस्था अध्यक्ष पदी चंद्रकांत सुतार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असून मावळते अध्यक्ष शैलेंद्र दळवी यांनी माथेरान कोकणवासीय समाज संस्थेचा मागील पाच वर्षांचा पदभार नव्याने निवड झालेल्या अध्यक्षांना सुपूर्द केला.

माथेरान डोंगरमाथ्यावर कोकणातील मंडळी हि आपल्या कुटुंबासहित आजही वास्तव्यात आहेत.मागील चोवीस वर्षांपासून येथे कोकणवासीय समाज संस्थेत ही कुटुंबे एकजुटीने कार्यरत आहेत. गावाच्या आणि समाजाच्या हिताचे अनेक कार्यक्रम समाजाच्या वतीने येथे राबविले जातात. मंगळवारी (दि.१६) माथेरानमधील हॉटेल स्प्रिंग वुड येथे कोकणवासीय समाज संस्थेचे पंचवार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मागील कार्यकारिणीचा पाच वर्षांचा कार्यभार पूर्ण झाला असून यावेळी नवीन कार्यकारिणी आणि नवीन अध्यक्षांची निवड करण्यात आली.यावेळी सर्वानुमते समाजाचे मागील पंधरा वर्षे सचिव पदी योगदान देणारे तसेच सामाजिक कामाचा उत्तम अनुभव असणारे चंद्रकांत सुतार यांची निवड करण्यात आली.

यावेळी मावळते अध्यक्ष शैलेंद्र दळवी यांनी नव्याने निवड झालेल्या अध्यक्षांचे स्वागत करीत मागील पाच वर्षांचा सर्व पदभार त्यांच्या सुपूर्द केला. तसेच महिला अध्यक्षपदी सारिका पाटील यांची निवड करण्यात आली.

माथेरान कोकणवासीय समाज संस्थेला पंचवीस वर्षे पूर्ण होत असून रौप्य महोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमाचे आयोजनदेखील यावेळी करण्यात आले. सभेचे सूत्र संचालन माजी अध्यक्षांनी केले तसेच सचिव ललित पांगसे यांनी सर्वांचे आभार मानले.

# रिसॉर्टमध्ये जाण्याचा रस्ता अडवला;गुन्हा दाखल

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत चौक रस्त्यावरील एका नामांकित रिसॉर्टकडे जाणारा रस्ता स्थानिक फार्म हाऊस मालक यांनी अडवला आहे. त्याबद्दल रिसोर्ट मालकाने पोलिसात तक्रार दाखल केली असून रिसॉर्टमध्ये पर्यटक ग्राहक येण्याचा रस्ता बंद केल्याने रिसॉर्टचे नुकसान होत असल्याचा आरोप तक्रारीत केला आहे.

कर्जत चौक रस्त्यावर सॉल्ट हे नामांकित रिसॉर्ट आहे.या रिसॉर्टच्या मालक कबीर विरेन आहुजा यांनी आपल्या फार्ममधील झाडांसाठी आणि पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून त्यांच्या जागेमधून जाणाऱ्या पावसाळ्यात वाहणाऱ्या नाल्यात बंधारा बांधला आहे. गेली काही दिवस सुरू असलेल्या पावसामुळे आहुजा यांच्या जागेतून वाहणारा नाला ओसंडून वाहत आहे. त्यामुळे आहुजा यांच्या जमिनी मध्ये तसेच आजूबाजूचे जमिनीमध्ये देखील पावसाचे पाणी साचून राहिले आहे. त्या पाण्यामुळे आपल्या शेतीचे नुकसान झाल्याचे सांगत तेथे फार्म हाऊस असलेल्या महिला शेतकरी यांनी १२ जुलै रोजी आहुजा यांच्या मालकीच्या ऑलियंडर फार्ममध्ये घुसून त्या फार्ममधून जाणाऱ्या रस्त्यावर दगड आणि काठ्या यांच्या सहाय्याने तसेच येथे या महिला शेतकरी स्वतः बसून राहिल्या. त्यामुळे सॉल्ट नामक नामांकित हॉटेलमध्ये येणाऱ्या पर्यटक आणि ग्राहक यांची गैरसोय निर्माण झाली. त्यामुळे मागील शेतकरी यांना विनंती करून देखील त्यांच्याकडून रस्ता मोकळा करण्याबाबत कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने पोलीस ठाणे येथे जाऊन आपल्या जमिनीमध्ये जाण्यापासून रोखण्यात येत असल्याची तक्रार दाखल केली.

# स्नेहमेळाव्यात महिलांची धमाल

। कर्जत । वार्ताहर ।

वैश्य समाजाच्या कर्जतच्या माहेरवाशीणींनी स्नेहमेळाव्याचे आयोजन केले होते. यामध्ये अनेक जणी किती तरी वर्षांनी एकमेकींना भेटल्या होत्या. तेंव्हा त्यांनी सुख दुःखाच्या गोष्टी एकमेकींना सांगितल्या. काहींनी आपल्या लहानपणातील आठवणी, काहींनी कविता तर काहींनी गीते सादर करून धमाल केली. विशेष म्हणजे पाऊस असूनही माहेरवाशीणींनी उपस्थिती लक्षणीय होती.

रॉयल कॅम्पच्या सभागृहात वैश्य समाजाच्या कर्जतकर माहेरवाशिणींच्या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. जयवंती फक्के यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी लीना भोपतराव, विद्या पोटे, प्रियांका जगे, प्रीती ठकेकर, स्मिता तांबोळी, आरती भोईर, अपूर्वा भोपतराव, शिवानी काळबेरे आदी उपस्थित होते. सुरुवातीला प्रत्येकीने आपली ओळख करून दिली. त्यावेळी अनेक वर्षांनी भेटलेल्या मैत्रिणीच्या बालपणीच्या आठवणी जाग्या झाल्या.

निकिता नारकर, प्रीती ठकेकर, राजेश्री चौधरी, पूनम रोकडे, दिव्या खड्कबाण आणि मीनल महाजन यांनी कविता सादर केल्या. मात्र अपूर्वा भोपतराव माहेरची कविता सादर करीत असताना उपस्थितांचे डोळे पाणावले. त्यांनी एक गीतही सादर केले.

# नियमबाह्य उभ्या असणाऱ्या हातगाड्यांवर होणार कारवाई

। पेण । प्रतिनिधी ।

शहरात फळ विक्रेते, भाजी विक्रेते हातगाड्या रस्त्याच्या मधोमध लावतात. या हातगाड्यांमुळे नागरिकांना बाजारहाट करताना त्रासाला सामोरे जावे लागते. पेण शहरातील लाल बहादूर शास्त्री मार्ग, मिरची गल्ली, सोनार गल्ली, महावीर मार्ग या भागातील रस्ते अरुंद असल्याने हातगाडीच्या वावरामुळे वाहतूक कोंडी होऊन दळण-वळणात मोठा व्यत्यय निर्माण होतो. ही बाब लक्षात घेऊन पेण नगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने नियमबाह्य उभ्या असणाऱ्या हातगाड्या जप्त करण्यास सुरुवात केली आहे. ही मोहीम येत्या काळात आणखी तीव्र होण्याची माहिती अतिक्रमण विभागाचे महेश वडके यांनी आमच्या प्रतिनिधीला दिली. त्यांनी सांगितले की, आम्ही हातगाडीवाल्यांना अनेक वेळा समज दिली आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या मिळकतींमधील एकूण ५९४० चौरस मिटर क्षेत्राचा नियोजित बिनशेती भूखंड त्यामध्ये जाणे-येणेसाठी मौजे दत्तपाडा गट क्र. ५० हिस्सा क्र. १ आणि हिस्सा क्र. २ या मिळकतीमधून असलेल्या ९ मिटर रूंदीच्या रस्त्याच्या सामाईक वहिवाटीचे हक्कासह खरेदी घेण्याचा करार मिळकतीचे विद्यमान मालकांबरोबर केला आहे. सदर मिळकतीवरील मालकी हक्क निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतींचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मौजे दत्तपाडा या महसूली गावाचे हद्दीमधील :-

| विद्यमान मालकांचे नाव | भूमापन क्रमांक | क्षेत्र हे. आर चौ.मिटर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| स्लाविओ लक्झरी प्रोजेक्ट सिक्स एल. एल. पी. | ५२ | १-००-८० | १४.७२ |
| बिदूर प्रोजेक्ट रिअल्टी वन एल.एल.पी. | ५३ | १-५५-३० | ५.१३ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीमधील वर नमूद क्षेत्र खरेदी घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- १८/०७/२०२४

ॲड. रविंद्र वि. ओक
'गुरूकृपा', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाची मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्याकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| पेढांबे ता. अलिबाग | २७ | ०-९१-०० पो.ख. ०-१८-०० | २३.३८ | प्रविण दत्तात्रेय साळुंके व ज्योती प्रविण साळुंके दोघेही रा. आवास ता. अलिबाग |
| | | एकूण १-०९-०० पैकी ०-५४-५० | १२.४६ | |
| पेढांबे ता. अलिबाग | २८/१ | ०-४९-७५ पो.ख. ०-०९-७५ | १२.५६ | |
| | | एकूण ०-५९-५० | | |

सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, (ॲड. संजय द. म्हात्रे)
तारीख : १७/०७/२०२४ पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नांदईपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर ९९, एकुण क्षेत्र ०-१२-३० हे. आर., आकार १.५० रू. पै. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक हरिश्चंद्र अर्जुन थळे, रा. मु. नांदईपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, (ॲड. संजय द. म्हात्रे)
तारीख : १७/०७/२०२४ पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## अलिबाग नगरपरिषद
### ई-निविदा सूचना सन २०२३-२४

अलिबाग नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडील साहित्य पुरवठा करणे कामी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई निविदा सूचना शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १८.०७.२०२४ पासून उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येईल.

सही/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री. सुनिल सावळाराम तोडेकर व सौ. अनिता सुनिल तोडेकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे सुगवे तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ४२/४ | एकुण क्षेत्र १-५२-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ०-७५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १८/०७/२०२४ ॲड. निलेश कान्हु मोरे
मोबा. ९८२२६९११०९ ऑफिस पत्ता - शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस
समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस
### महसूल व वन विभाग
### अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव यांचे कार्यालय
### कचेरी रोड,माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड

Email ID : altmangaon@gmail.com

जाहीर नोटीस — दावा क्रमांक : ७४/२०२४

प्रति,

१.चंद्रकांत गणु कासार, २. मधुकर गणु कासार, ३. मंजुळा महेंद्र काते, ४. रंजना यशवंत पवार क्र. १ ते ४ रा. पुरार ता. माणगाव, जि. रायगड ५. सदाशिव गणु कासार (मयत) तर्फे वार ५/१. मायावती सदाशिव कासार ५/२ रेणुका राजेंद्र साबळे क्र. ५/१ व ५/२ रा. पुरार ता. माणगाव, जि.रायगड ५/३ दिपीका नितीन महाडिक रा. मोरवणे ता. म्हसळा, जि. रायगड ५/४ प्रियंका प्रितम खेडेकर रा. खैरवाडी ता. माणगाव, जि. रायगड } वादी

विरुद्ध

१. कमरुद्दीन गु. महमद सरखोत २. शौकत गु. महमद सरखौत ३. हुसनाबानु अ. मुतल्लीब सरखोत ४. मतिन अ. मुतल्लीब सरखोत ५. मुनीब अ. मुतल्लीब सरखोत ६. मईन अ.मुतल्लीब सरखोत ७. नियाज महिबुल्ला नजीरी. सर्व रा. पुरार ता. माणगांव, जि. रायगड. } प्रतिवादी

ज्याअर्थी, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळ कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. आणि त्यासाठी जमिनीची खरेदी किंमत ठरवून मिळण्यासाठी न्यायाधिकरणाकडे दावा अर्ज दाखल केलेला आहे. आणि ज्याअर्थी न्यायाधिकरणाने कुळकायद्याच्या तरतुदीनुसार जमिनीची किंमत निर्धारीत करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी सदर दाव्याची सुनावणी दिनांक १९-०७-२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आली आहे. तरी सदर तारखेस अपर तहसीलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, माणगांव, जि. रायगड येथे स्वत: वकील अथवा प्रतिनिधीमार्फत न्यायाधिकरणापुढे हजर राहून बाजू मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचून नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसूर करील, तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालवून न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

**अनुसुची**

| गावाचे नाव | स.नं. | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| पुरार ता. माणगाव | ६६ | ०-५८-०० ०-०६-०० ०-६४-०० | ४.९४ |

ठिकाण : माणगांव सही/-
दिनांक :- १२-०७-२०२४ (विकास गारुडकर)
अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस आमचे अशिल सौ. अस्मिता सचिन म्हात्रे, रा. मु. विद्यानगर, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड. यांनी दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरुन नोटीस देण्यात येते ती खालील प्रमाणे,

आमचे अशिल व श्री. अशिष अंकुश वार्डे यांचे वडिल कै. अंकुश रामचंद्र वार्डे यांचे मालकी, ताबे, कब्जा, वहिवाट व कसवणूकीत मौजे म्हात्रोली, गट नंबर २३१/१ व मौजे-म्हात्रोली, गट नंबर २३१/१ या जमिन मिळकती होत्या. त्यांचे पश्चात वर वर्णन केलेल्या मिळकतींचे ७/१२ सदरी वारसनोंद झालेली आहे. सदर वारसनोंदी प्रमाणे सर्व वारसांची नावे महसुल दप्तरी दाखल करण्यात आलेले आहेत. वर वर्णन केलेल्या मिळकती व इतर कौटूंबिक एकत्र कुटूंबाच्या मिळकती आमचे अशिल यांचे सामाईक मालकी, ताबे, कब्जा, वहिवाट व कसवणूकीत होत्या व आहेत.

आमचे अशिल यांनी दिनांक- ३०/०३/२०२२ रोजी श्री. अशिष अंकुश वार्डे, रा. मु. कोप्रोली, पो. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड. यांस वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात अखत्यारपत्र करून दिलेले आहे. सदर अखत्यारपत्र अलिबाग येथील मे दुय्यम निबंधक कार्यालय अलिबाग येथे नोंदणीकृत करण्यात आलेले आहे. सदर दस्ताचा अनु. क. अलब १२००/२०२२ असा आहे. सदरचे अखत्यारपत्र हे फक्त महसुल दप्तरी फेरफार नोंदी करणे करिता विशेष अधिकार म्हणून दिलेले होते. आमचे अशिलांस यापुढे श्री. अशिष अंकुश वार्डे, रा. मु. कोप्रोली, पो. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड. यांस आपले अखत्यारी म्हणून ठेवण्याचे नाही. श्री. अशिष अंकुश वार्डे यांस दिलेले अखत्यारपत्र व त्या अनुषंगाने दिलेले अधिकार आमचे अशिलांस वैयक्तिक व इतर कारणांकरिता रद्द करणे आवश्यक वाटत आहे. आमचे अशिल यांनी श्री. अशिष अंकुश वार्डे यांस रजिस्टर्ड नोटीस पाठवून त्यांस दिनांक- ३०/०३/२०२२ रोजी दिलेले अखत्यारपत्र व त्या अनुषंगाने दिलेले अधिकार वैयक्तिक व इतर कारणांकरिता रद्द केलेले आहे. त्याचप्रमाणे सदर अखत्यारपत्राने श्री. अशिष अंकुश वार्डे यांस दिलेले सर्व अधिकार आमचे अशिल यांनी काढुन घेतलेले आहेत व रद्द केलेले आहेत.

तरी वर नमूद मिळकती संदर्भात श्री. अशिष अंकुश वार्डे यांच्यासोबत कोणताही करार अगर व्यवहार कोणीही करु नये. सदर करारास व व्यवहारास आमचे अशिलांची कडक हरकत आहे. वर नमूद मिळकती संदर्भात आमच्या अशिलांच्या अपरोक्ष व पुर्व परवानगी शिवाय कोणताही व्यवहार अगर करार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. त्याचप्रमाणे आमच्या अशिलांच्या अपरोक्ष व पूर्व परवानगी शिवाय कोणताही व्यवहार अगर करार केल्यास संबंधित इसमांवर आमचे अशिल दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कारवाई करतील. हे तमाम जनतेस कळावे.

अलिबाग सही/-
ता. /०७/२०२४ ॲड. राजीव नथुराम शेरमकर
रा.समर्थ को.ऑप. हौसिंग सोसायटी, रोहिदास
नगर, चेंढरे, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, श्री. कृष्णा श्याम चव्हाण रा. पिलोसरी, ता. सुधागड यांनी या कार्यालयात स्वतःच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे. सदर अर्जात त्यांनी प्रतिज्ञापत्राद्वारे त्यांचा जन्म दि. ०३-०८-१९९१ रोजी मौजे-पिलोसरी, ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे नमूद केले आहे.

सदरहू कृष्णा श्याम चव्हाण यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसात्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

सदर नोटीस पेपर नोटीस प्रसिद्धीकरीता माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली आहे.

ठिकाण : सुधागड पाली
दिनांक : /०७/२०२४

सही/-
(उत्तम कुंभार)
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी सुधागड

**निवडक**

## ५० लाखांचे अर्थसहाय्य

**सातारा :** पॅरिस येथील ऑलिम्पिक आणि पॅरा ऑलिंपिकमध्ये उज्ज्वल कामगिरी करण्यासाठी महाराष्ट्रातील १२ खेळाडूंना प्रोत्साहन (आर्थिक सहाय्य) म्हणून राज्य शासनाने प्रत्येकी ५० लाख रुपये असे एकूण सहा कोटी रुपये देण्याचे निश्चित केले आहे. १२ खेळाडूंमध्ये सातारा जिल्ह्यातील आर्चरी खेळाडू प्रवीण जाधव याचा समावेश आहे. ऑलिम्पिक स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेची तयारी करण्यासाठी यापूर्वी अर्थ साहाय्य देण्यात येत होते.

## शमी मैदानात परतला

**नवी दिल्ली :** एकदिवसीय वर्ल्ड कप २०२३ मध्ये शानदार गोलंदाजी करणारा भारतीय गोलंदाज मोहम्मद शमी लवकरच मैदानात परतणार आहे. नेटमध्ये सराव करतानाचा एक व्हिडिओ त्याने सोशल मीडियावर पोस्ट करून ही माहिती दिली. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये एकदिवसीय वर्ल्ड कप खेळल्यानंर तो मैदानाबाहेर होता. वर्षाच्या सुरुवातीला शमीचे ऑपरेशन झाले होते. त्यामुळे तो आयपीएल २०२४ आणि टी-२० वर्ल्ड कपसह ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या घरच्या मालिकेला मुकला होता.

## क्रिकेटचे रँकिंग जारी

**नवी दिल्ली :** आयसीसीने नव्याने टी-२० क्रिकेटचे रँकिंग जारी केले आहे. यामध्ये हार्दिक पांड्याला मोठा फटका बसलाय, तर यशस्वी जयस्वालला फायदा झाला आहे. भारत आणि झिम्बॉब्वे यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दमदार कामगिरीचा यशस्वी जयस्वाल आणि शुभमन गिलला फायदा झाला आहे. यशस्वी जयस्वाल हा दहाव्या स्थानावरुन सहाव्या स्थानावर पोहोचला आहे. शुभमन गील टी-२० रँकिंगमध्ये ३७ व्या स्थानावर पोहोचला आहे.

## जतीन गंभीरवर संतापला

**मुंबई :** भारताचा माजी क्रिकेटपटू जतीन परांजपे यांनी भारतीय क्रिकेट संघाचा नवनियुक्त प्रशिक्षक गौतम गंभीरवर कठोर शब्दांमध्ये टीका केली आहे. परांजपे यांनी बीसीसीआयने सध्या जे सहप्रशिक्षक आहेत. त्यांनाच कायम ठेवले पाहिजे, असे म्हटले आहे. भारताला टी-२० वर्ल्ड कप २०२४ जिंकवून देण्यामध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या सहप्रशिक्षकांना कायम ठेवण्याची भूमिका बीसीसीआयने घ्यायला हवी, असे या माजी खेळाडूने म्हटले आहे. गंभीरच्या भूमिकेला त्यांनी प्रखर विरोध केला आहे.

## महाकुंभाला ९ दिवस शिल्लक

**पॅरिस :** ऑलिम्पिक २०२४ सुरू होण्यासाठी ९ दिवस शिल्लक आहेत. पॅरिसमध्ये २६ जुलैपासून खेळ सुरू झाल्यावर तीन ऑलिम्पिकचे आयोजन करणारे लंडननंतरचे ते दुसरे शहर ठरेल. यापूर्वीचे ऑलिम्पिक पॅरिसमध्ये १९०० आणि १९२४ मध्ये झाले होते, तर लंडनने १९०८, १९४८ आणि २०१२ मध्ये त्यांचे आयोजन केले होते. पॅरिसमध्ये १०० वर्षांनंतर समर गेम्स आयोजित केले जात आहेत, ज्याचे ब्रीदवाक्य आहे. 'गेम्स वाइड ओपन' म्हणजे खेळ मोठे, वेगळे आणि अधिक खुले आहेत.

# अनोखे सेलिब्रेशन भोवले

## हरभजन सिंग, युवराज सिंग, सुरेश रैनावर गुन्हा दाखल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स लीग २०२४ च्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा पराभव केला. या विजयानंतर हरभजन सिंग , युवराज सिंग आणि सुरेश रैनाने तौबा तौबा या गाण्यावर रील बनवून अनोखे सेलिब्रेशन केले होते. पण, या सेलिब्रेशनवरुन वाद निर्माण झाला आहे. या रीलमध्ये दिव्यांग व्यक्तींचा अपमान केल्याचा आरोप या क्रिकेटपटूंवर करण्यात आला आहे. तसेच, याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाकिस्तानवर मिळवलेल्या ऐतिहासिक विजयानंतर भज्जी आणि रैनासह युवराज सिंगने केलेले भन्नाट सेलिब्रेशन सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले. पण, यावर नेटकऱ्यांसह पॅरा बॅडमिंटन स्टार मानसी जोशीने आक्षेप नोंदवला. यानंतर हरभजनने सोशल मीडियावर माफी मागून व्हिडिओ डिलिटदेखील केला. पण,



आता नॅशनल कौन्सिल फॉर प्रमोशन ऑफ एम्प्लॉयमेंट फॉर डिसेबल्ड पीपलने तिघांविरोधात एफआयआर दाखल केली आहे. हरभजनने इन्स्टाग्रामवर हा व्हिडिओ शेअर केला होता. इन्स्टाग्रामची मालकी मेटाकडे असल्याने, मेटा इंडिया विरोधातदेखील माहिती तंत्रज्ञान कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आली आहे. एनसीपीईडीपीचे कार्यकारी संचालक अरमान अली यांनी या संपूर्ण प्रकरणावर एक निवेदन जारी केले आहे. एफआयआर का नोंदवला गेला? अरमान अली म्हणाले, हरभजन सिंग , युवराज सिंग आणि सुरेश रैना यांनी व्हिडिओतून अपंगांची खिल्ली उडवली आहे. भारतात राहणाऱ्या अंदाजे १० कोटी अपंग लोकांचा हा अपमान आहे, असे मला वाटते. हरभजन सिंग हे राज्यसभेचे खासदार आहेत आणि त्यांनी अशाप्रकारे व्हिडिओ बनवणे योग्य नाही. विशेषत: भारतात अपंगत्वाबाबत जागरुकतेचा फार मोठा अभाव आहे. तुम्ही लोकांची चेष्टा करत आहात, म्हणूनच मी एफआयआर दाखल केली आहे. हरभजन सिंगने त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन हा व्हिडिओ डिलीट केला आहे. तसेच, याबाबत स्पष्टीकरण देताना म्हणाला की, इंग्लंडमध्ये चॅम्पियनशिप जिंकल्यानंतर सोशल मीडियावर तौबा तौबाच्या आमच्या अलीकडील व्हिडिओंबद्दल अनेकांनी तक्रार केली. त्यांना मला सांगायचे आहे की, कोणाच्याही भावना दुखावण्याचा आमचा हेतू नव्हता. आम्ही प्रत्येक व्यक्ती आणि समुदायाचा आदर करतो आणि हा व्हिडीओ केवळ मनोरंजनासाठी होता. सतत १५ दिवस क्रिकेटमध्ये रमल्याने आमचे शरीर थकले होते. त्यामुळे आम्ही अशाप्रकारचा व्हिडिओ बनवला. कोणाच्या भावना दुखावल्या असतील, तर मी सर्वांची माफी मागतो. आम्ही कोणाचाही अपमान किंवा अपमान करण्याचा प्रयत्न करत नाही, असे भज्जी यांनी सांगून या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

# सूर्यकुमारकडे ट्वेन्टी-२० संघाचे नेतृत्व?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा आक्रमक फलंदाज सूर्यकुमार यादव २०२६ विश्वचषकापर्यंत भारताच्या ट्वेन्टी-२० संघाचे नेतृत्व करण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. कर्णधारपदासाठीचा प्रबळ दावेदार असलेल्या हार्दिक पंड्याला तो मागे टाकू शकतो. पंड्याने या महिन्यात श्रीलंकेविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेसाठी स्वत:ला उपलब्ध ठेवले आहे. मात्र, गेल्या वर्षी ऑस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आठ ट्वेन्टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्व करणारा सूर्यकुमार हा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांची पहिली पसंती असल्याची चर्चा आहे.

गेल्या महिन्यात वेस्ट इंडिजमध्ये भारताने ट्वेन्टी-२० विश्वचषक उंचावला. त्यानंतर रोहित शर्माने क्रिकेटच्या या प्रारुपातून निवृत्ती जाहीर केली. त्यानंतर नवीन कर्णधाराचा शोध कायम आहे. ट्वेन्टी-२० विश्वचषक विजेत्या संघातील पंड्याने वैयक्तिक कारणांमुळे श्रीलंकेविरुद्धच्या तीन सामन्यांतून विश्रांती घेण्याचा निर्णय घेतला आहे.

श्रीलंकेविरुद्धचे ट्वेन्टी-२० सामने २७ ते ३० जुलैदरम्यान पालेकेले येथे होणार आहे. यानंतर २ ते ७ ऑगस्टदरम्यान कोलंबो येथे एकदिवसीय मालिका होईल. काही दिवसांत श्रीलंकेच्या दौऱ्यासाठी भारतीय संघाची घोषणा होणे अपेक्षित आहे. हार्दिक पंड्या भारताच्या ट्वेन्टी-२० संघाचा उपकर्णधार होता. आता तो पूर्णपणे तंदुरुस्त आहे. तो तीन सामन्यांच्या ट्वेन्टी-२० मालिकेसाठी तो उपलब्धही असेल.



त्यामुळे तो संघाचे नेतृत्व करेल असे वाटत होते. मात्र, सूर्यकुमार यादव केवळ श्रीलंकेच्या दौऱ्यासाठी नाही तर, २०२६ विश्वचषकापर्यंत संभाव्य कर्णधार बनू शकतो, असे बीसीसीआयच्या एका वरिष्ठ सूत्राने सांगितले. पंड्याने वैयक्तिक कारणामुळे एकदिवसीय मालिकेतून विश्रांती घेतली आहे, अशीही माहिती सूत्राने दिली. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत केएल राहुलने संघाचे नेतृत्व केले होते. त्यामुळे राहुलवर एकदिवसीय मालिकेत कर्णधारपदाची जबाबदारी दिली जाऊ शकते. तसेच गिलही या पदासाठी आपली दावेदारी उपस्थित करेल.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट कार्यक्रम नसताना सर्व तारांकित क्रिकेटपटूंना स्थानिक क्रिकेट खेळावे लागेल, असे बीसीसीआयचे सचिव जय शहा यांनी स्पष्ट केले आहे. मात्र यासाठी रोहित शर्मा, विराट कोहली आणि जसप्रीत बुमरा यांना सूट देण्यात आली आहे.

कसोटी खेळणाऱ्या सर्व खेळाडूंनी ऑगस्टमध्ये होणाऱ्या दुलीप करंडक स्पर्धेतील कमीत कमी एक सामना खेळावा, असे 'बीसीसीआय'ला वाटते. त्यानंतर भारतीय संघ बांगलादेश व न्यूझीलंड संघांविरुद्ध कसोटी मालिका खेळणार आहे.

## मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम विभागाचे महिला गटाचे संघ जाहीर

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

शहर कबड्डी असो.ने ७१ व्या महिला गट राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेकरीता आपले दोन्ही संघ जाहीर केले आहेत. योगिता राऊत हिच्याकडे पूर्व, तर साधना विश्वकर्माकडे पश्चिम विभागाचे नेतृत्व सोपविण्यात आले आहे. पुणे, बालेवाडी येथील श्री छत्रपती क्रीडा संकुल येथे १७ ते २० जुलै या कालावधीत हे सामने होणार आहेत.

**मुंबई शहर पूर्व :** योगिता राऊत (संघनायिका), शितल बावडेकर, मेघा कदम, धनश्री पोटले, प्रीती हांडे, साक्षी सावंत, कशिश पाटील, सोनाली सुतार, लेखा शिंदे, मीनाक्षी नाईक, कादंबरी पेडणेकर, श्रावणी घाडीगावकर. प्रशिक्षक-नितीन विचारे, व्यवस्थापिका-सुनंदा बुरकल यांचा समावेश आहे.

**मुंबई शहर पश्चिम :** साधना विश्वकर्मा (संघनायिका), पौर्णिमा जेधे, पूजा यादव, प्रतीक्षा तांडेल, श्रद्धा कदम, दिव्या रेडकर, प्राची भदवणकर, मानसी पाटील, अस्मिता जंगम, अश्विनी जंगम, शितल मेंगडे, आंचल यादव, प्रशिक्षक : संदीप कालगावकर, व्यवस्थापिका : कांचन मुळीक-राणे यांचा समावेश आहे.

# श्रीलंकेचा माजी कर्णधार धम्मिका निरोशनाची गोळ्या झाडून हत्या

**। कोलंबो । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघ येत्या २७ तारखेपासून श्रीलंकेच्या धरतीवर ट्वेंटी-२० मालिका खेळणार आहे. यानंतर भारत आणि श्रीलंका यांच्यात वन डे मालिका खेळवली जाईल. या मालिकेला सुरुवात होण्याआधीच श्रीलंकेत एक धक्कादायक घटना घडली. श्रीलंकेच्या अंडर-१९ संघाचा माजी कर्णधार धम्मिका निरोशनाची अज्ञातांनी गोळ्या झाडून हत्या केली आहे. ४१ वर्षीय निरोशनाची अंबालांगोडा येथील कांडा मावाथा येथील त्याच्या राहत्या घरी हत्या



करण्यात आली.

या घटनेनंतर स्थानिक पोलिसांनी सांगितले की, हत्या झाली तेव्हा निरोशना त्याची पत्नी आणि दोन मुलांसोबत होता. तितक्यात हल्लेखोराने त्याच्यावर बंदुकीने गोळ्या झाडल्या. पोलिसांना अद्याप संशयित आणि हत्तेमागील कारण समजलेले नाही.

या घटनेचा तपास सुरू आहे. डावखुरा खेळाडू निरोशना अष्टपैलू कामगिरी करण्यात माहिर होता. त्याने २००० मध्ये श्रीलंकेच्या १९ वर्षाखालील संघात पदार्पण केले. त्याने २००२ मध्ये न्यूझीलंडच्या धरतीवर झालेल्या अंडर-१९ विश्वचषकात श्रीलंकेच्या संघाचे कर्णधारपद सांभाळले होते. तेव्हा ५ सामन्यांमध्ये ७ बळी घेण्यात निरोशनाला यश आले. १२ प्रथम श्रेणी सामने खेळलेल्या निरोशनाने २०० हून अधिक धावा आणि १९ बळी घेतले आहेत.

## इंग्लंड क्रिकेटपटूच्या घरावर अज्ञाताने केला दोन वेळा हल्ला

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

इंग्लंडचा क्रिकेटपटू आणि हॅम्पशायरचा कर्णधार जेम्स व्हिन्सच्या कुटुंबाला कोणीतरी वेठीस धरले आहे. मागील चार महिन्यांपासून त्याच्या आयुष्यातील सर्व सुख-शांती हरवली आहे. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की जेम्सलसा त्याचे राहते शहर साउथॅम्प्टन सोडावे लागले.

इंग्लंडसाठी १३ कसोटी २५ एकदिवसीय आणि १७ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळलेल्या जेम्स व्हिन्सच्या मालमत्तेवर सतत आक्रमण होत आहे. पहिला हल्ला १५ एप्रिल २०२४ रोजी झाला होता. सीसीटीव्ही फुटेजमध्ये अज्ञात हल्लेखोर विन्सच्या घराच्या आवारात घुसून वाहने आणि घरावर हल्ला करताना दिसत आहेत. पोलिस पोहोचेपर्यंत हल्लेखोराने सर्वकाही उद्ध्वस्त केले होते. एक कार उभी असल्याचे शेजाऱ्याने पाहिले होते. घर आणि कारची दुरुस्ती करण्यासाठी विन्सला तात्पुरते घर सोडावे लागले. घरी परतल्यानंतर जेमतेम एक आठवड्यानंतर ११ मे रोजी दुसरा हल्ला झाला. पोलीस या प्रकरणी हल्लेखोरांचा शोध घेत आहेत, मात्र अद्याप त्यांच्या हाताला काहीच लागले नाही.

# तेंडुलकर, लारापेक्षा कार्ल हूपर सरस

## माजी क्रिकेटर ब्रायन लाराचा दावा

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

सचिन तेंडुलकरचा चांगला मित्र आणि वेस्ट इंडिजचा माजी क्रिकेटपटू ब्रायन लारा याने एक मोठा दावा केला आहे. आपल्या काळात एक असा खेळाडू होता, जो सचिन तेंडुलकर आणि माझ्यापेक्षाही चांगला होता, असे लाराने म्हटले आहे. लाराने कार्ल हूपरचे नाव घेतले आहे.

क्रिकेटच्या इतिहासाकडे जेव्हा-जेव्हा मागे वळून पाहिले जाईल तेव्हा तेव्हा सचिन तेंडुलकरची आठवण आल्याशिवाय राहणार नाही. सचिन तेंडुलकरच्या फलंदाजीने सर्वच क्रिकेट प्रेमींना अक्षरशः भुरळ घातली होती. वेस्ट



इंडिजचा माजी क्रिकेटपटू ब्रायन लारा याने एक मोठा दावा केला आहे. आपल्या काळात एक असा खेळाडू होता, जो सचिन तेंडुलकर आणि माझ्यापेक्षाही चांगला होता, असे लाराने म्हटले आहे. ब्रायन लाराने त्याचे पुस्तक मलारा : द इंग्लंड क्रोनिकल्सफमध्ये सचिन तेंडुलकर आणि त्याच्या पेक्षाही चांगला खेळाडू कोण होता? हे सांगितले आहे. महान ऑलराउंडर कार्ल हूपरने वेस्टइंडीजसाठी १०२ टेस्ट आणि २२७ वनडे आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. त्याने टेस्ट क्रिकेटमध्ये ५७६२ धावा केल्या आहेत.

वनडेमध्ये त्याच्या नावावर ५७६१ धावा आहेत. त्याने टेस्टमध्ये ११४ तर वनडेमध्ये १९३ विकेट घेतल्या आहेत. कार्लने आपल्या क्षमतेचा पूर्ण वापर केला असता तर तो तेंडुलकरपेक्षा चांगला फलंदाज ठरला असता, असे लारा म्हणाला.

# पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धा भारतात कुठे पाहता येणार?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेचे ३३ वे पर्व पॅरिसमध्ये २५ जुलै ते ११ ऑगस्टमध्ये पार पडणार आहे. भारतीयांना ऑलिम्पिक स्पर्धा स्पोर्ट्स १८ चॅनेलवर पाहता येईल. तसेच जिओ सिनेमाने ऑलिम्पिक २०२४ स्पर्धा फ्रीमध्ये दाखवण्याची घोषणा केली आहे. तसेच दूरदर्शवरील स्पोर्ट्स चॅनेलवर देखील हे सामने पाहता येणार आहेत.**

जगभरातील दहा हजाराहून अधिक स्पर्धक भाग घेणार आहेत. भारताच्या दलात ११३ स्पर्धक



सहभागी आहेत.

तीरंदाजी, एथलेटिक्स, बॅडमिंटन, बॉक्सिंग, इक्वेस्ट्रियन, गोल्फ, हॉकी, शूटिंग, सेलिंग, टेबल टेनिस, टेनिस, कुस्ती, वेटलिफ्टिंग, स्विमिंग, रोव्हिंग, ज्युडो या खेळात भारतीय खेळाडू सहभागी आहे. भारताकडून नीरज चोप्रा, मीराबाई चानू आणि निखत जरीन यांच्याकडून पदकाची अपेक्षा आहे. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धा २६ जुलैपासून ११ ऑगस्टपर्यंत आहे.

### स्पर्धेत हे खेळ नसणार

टोक्यो ऑलिम्पिक २०२० स्पर्धेत समितीने कराटे, बेसबॉल आणि सॉफ्टबॉल सहभागी केले होते. पण पॅरिस ऑलिम्पिकमध्ये हे खेळ नसतील.ऑलंपिकमध्ये पहिल्यांदाच स्केटबोर्डिंग, स्पोर्ट क्लायम्बिंग, सर्फिंग आणि ब्रेकिंग अपारंपरिक खेळांचा समावेश झाला आहे. ब्रेकिंगला डान्सिंग असं संबोधलं जातं. हा खेळ पहिल्यांदाच खेळला जाणार आहे. पॅरिसमध्ये यापूर्वी दोन ऑलंम्पिक स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. १९०० आणि १९२४ मध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. पॅरिस हा लंडन तिसऱ्यांदा यजमानपद भूषविणार आहे. यापूर्वी टोक्यो ऑलिम्पिकमध्ये भारताच्या झोळीत एकूण ७ पदकं आली होती. या स्पर्धेत भारताकडून अपेक्षा वाढल्या आहेत.

### ऑलिम्पिक स्पर्धा कुठे पाहता येणार?

भारतीयांना ऑलिम्पिक स्पर्धा स्पोर्ट्स १८ चॅनेलवर पाहता येईल. तसेच जिओ सिनेमा ॲपवर ही स्पर्धा फ्रीमध्ये पाहू शकता. जिओ सिनेमाने ऑलिम्पिक २०२४ स्पर्धा फ्रीमध्ये दाखवण्याची घोषणा केली आहे. तसेच दूरदर्शवरील स्पोर्ट्स चॅनेलवर देखील हे सामने पाहता येणार आहेत.

## ७१ व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा

# रायगड, पुणे शहर, परभणी, अहमदनगर या संघाचा विजय

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

७१ व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेत पहिल्या दिवशी झालेल्या सामन्यात पुरुष विभागात पुणे शहर, परभणी, रायगड, अहमदनगर या संघानी विजय मिळविले.

बाणेर येथील बाबुराव चांदेरे सोशल फाऊंडेशन व पुणे जिल्हा कबड्डी असो. यांच्या संयुक्तविद्यमाने श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, बाणेर, येथे ७१ व्या महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या पुरुष व महिला गटाच्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी सतेज करंडक स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात ड गटात पुणे शहर संघाने नांदेड संघावर ४७-३४ अशी मात केली. मध्यंतराला पुणे शहर संघाकडे २८-१७ अशी आघाडी होती. पुणे शहर संघाच्या सुनिल दुबिले व मनोज बोंद्रे यांनी सुरेख खेळ करीत आपल्या संघाला सहज विजय मिळवून दिला. नांदेडच्या शक्ती शेडमाडे, अजय राठोड यांनी काहिसा प्रतिकार केला. तर सौरभ राठोड यांने पकडी घेतल्या.

ब गटात रायगड संघाने सोलापूर



संघावर ५९-१७ असा विजय मिळविला. मध्यंतराला रायगड संघाकडे ३५-५ अशी भक्कम आघाडी होती. वैभव मोरे व अनुराग सिंग यांनी चौफेर चढाया करीत आघाडी घेतली. सुमित पाटील व राकेश गायकवाड यांनी पकडी घेतल्या. सोलापूरच्या कुमार चव्हाण, अनिकेत वाघमारे यांनी काहीसा प्रतिकार केला तर प्रफुल कांबळे व बाळु व्हरांडे यांनी पकडी घेतल्या. क गटात परभणी संघाने उस्मानाबाद संघावर ४६-२६ अशी मात केली. मद्यंतराला परभणी संघाकडे २९-१४ असी आघाडी होती. परभणी संघाच्या राहुल लांडगे व गलिव शेख यांनी सुरेख खेळ केला. रत्नाकर घाडगे याने पकडी घेतल्या. उस्मानाबाद सुरेश शिंदे व सुरज पवार यांनी चांगला खेळ केला. तर संदिप मगर याने पकडी घेतल्या.

ब गटात अहमदनगर संघाने ठाणे शहर संघावर ३३-२० अशी मात करीत आपल्या गटात विजय मिळविला. मद्यंतराला अहमदनगरकडे १३-११ अशी दोन गुणांची आघाडी होती. अहमदनगरच्या सौरभ राऊत याने सुरेख खेळाचे प्रदर्शन केले. तर शंकर गदई याने चांगल्या पकडी केल्या. ठाणे शहरच्या अक्षय मकवाना व रोहन टोपारे यांनी चांगला खेळ केला. क गटात अत्यंत अटितटीच्या झालेल्या गटातील सामन्यात पिंपरी चिंचवड व उपनगर पुर्व यांचा सामना निर्धारित वेळेत २९-२९ असा समान गुणांवर संपला. त्यामुळे दोन्ही संघाना एक एक साखळी गुण देण्यात आला. मद्यंतराला पिंपरी चिंचवड संघाकडे १८-१२ अशी आघाडी होती. पिंपरी चिंचवडच्या विशाल ताटे, आदित्य चौगुले याने जोरदार खेळ केला. तर गौरव तापकीर याने पकडी घेतल्या. उपनगर पुर्व आर्यवर्धन नवले याने आक्रमक खेळ केला. अक्षय बर्डे याने पकडी घेतल्या. अ गटात मुंबई शहर पश्चिम संघाने पालघर संघावर ३७-३४ असा विजय मिळविला. मध्यंतराला मुंबई शहर पश्चिम संघ १२-१७ असा पिछाडीवर होता. अक्षयकुमार सोनी व सुशांत साईल यांनी आक्रमक खेळ केला. सिध्देश तटकरे व विनोद अत्यालकर यांनी पकडी घेतल्या. सायंकाळच्या सत्रात इ गटात झालेल्या सामन्यात रत्नागिरी संघाने नासिक शहर संघावर २८-२२ असा विजय मिळविला. मद्यंतराला रत्नागिरी संघाकडे १७-११ अशी आघाडी होती. रत्नागिरी संघाच्या ओमकार कुंभार, अभिषेक भोजने यांचे चौफेर चढाया करीत आपल्या संघाला विजय मिळविला. साईराज कुंभार व अथर्व धुमाळ यांनी पकडी घेतल्या.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)